बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



सामाहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३३ | बुधवार,दि.२३ जुलै २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :-** भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज, सोमवारी तात्काळ प्रभावाने आपल्या पदाचा राजीनामा दिला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आरोग्याच्या कारणास्तव आणि वैद्यकीय सल्ल्याचा हवाला देत संविधानाच्या कलम ६७ (अ) अंतर्गत राजीनामा देण्याची घोषणा केली.



राष्ट्रपती मुर्मू यांना दिलेल्या पत्रात जगदीप धनखड म्हणाले की, 'आरोग्याला प्राधान्य देऊन आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करून, मी तात्काळ प्रभावाने भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा देत आहे.' त्यांनी राष्ट्रपतींचे सहकार्य आणि सौहार्दपूर्ण संबंधांबद्दल आभार मानले. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचे त्यांच्या सहकार्य आणि मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. राजीनामा पत्रात धनखड म्हणाले की, संसदेतील सर्व सन्माननीय सदस्यांकडून मला मिळालेला स्नेह, विश्वास आणि आदर आयुष्यभर माझ्या हृदयात राहील. या महान लोकशाहीत उपराष्ट्रपती म्हणून मला मिळालेल्या अनुभवाबद्दल आणि दृष्टिकोनाबद्दल मी मनापासून आभारी आहे.

जगदीप धनखड यांनी २०२२ मध्ये भारताचे चौदावे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. उपराष्ट्रपती पदाच्या ६ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या निवडणुकीत त्यांनी विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांचा पराभव केला. जगदीप धनखड यांना एकूण ७२५ पैकी ५२८ मते मिळाली, तर मार्गारेट अल्वा यांना १८२ मते पडली होती. उपराष्ट्रपती होण्यापूर्वी ते पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. जगदीप धनखड यांचा जन्म १८ मे १९५१ रोजी राजस्थानातील झुंझुनू जिल्ह्यातील एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील शाळेतूनच पूर्ण केले. त्यानंतर, शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर ते चित्तोडगड सैनिक शाळेत शिकण्यासाठी गेले.

धनखड यांची राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये निवड झाली होती परंतु ते गेले नाहीत. त्यांनी जयपूरच्या महाराजा कॉलेजमधून बीएससी (ऑनर्स) पदवी प्राप्त केली. राजस्थान विद्यापीठातून कायद्याचा अभ्यास पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी जयपूरमध्ये राहून वकिली सुरू केली आणि राजस्थान उच्च न्यायालयाचे एक प्रसिद्ध वकील होते. जगदीप धनखर चौधरी देवीलाल यांच्या राजकारणाने प्रभावित होते. देवीलाल यांनीच त्यांना राजकारणात आणले होते.

## पाचव्या दिवशीही परिचारिकांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरुच

**गोंदिया:-** महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्यावतीने परिचारिकांच्या विविध मागण्यांसाठी १८ जुलै पासून संपूर्ण राज्यात बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे. गेल्या मंगळवारी आणि बुधवारी संघटनेच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात आले तर गुरुवारी संपूर्ण राज्यात एक दिवसीय काम बंद आंदोलन करण्यात आले. मात्र सरकारने दखल घेतली नसल्याने शुक्रवारी १८ जुलैपासून राज्यातील सर्व परिचारिकांनी बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.




अधिपरिचारिका, परिसेविका, पाठ्यनिर्देशिका या पदावरील कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटी दूर कराव्यात, परिचारिकांची कंत्राटी भरती रद्द करून कायमस्वरुपी पदभरती सुरू करावी, रिक्त पदं पदोन्नतीनं भरावीत, चाळीस वर्षांपासून प्रलंबित भत्ते मंजूर करावेत यासह अन्य प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी काम बंद आंदोलन सुरू आहे. बेमुदत काम बंद आंदोलनाच्या आजच्या चौथ्या दिवशी सीपीआर आवारात परिचारिकांनी एकत्र येऊन आपल्या मागण्यांसाठी राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर आंदोलकांनी सीपीआर आवारात रक्तदान केले.

यावेळी आंदोलकांनी पथनाट्य सादर करत सरकारचे आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले.या आंदोलनामुळे आरोग्यसेवा कोलमडली असून, रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाइकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### लोकल ट्रेन साखळी बॉम्बस्फोटातील सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता

मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल समोर आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने सर्व १२ दोषींची निर्दोष सुटका केली आहे. यापैकी एकाचा या कालावधीत मृत्यू झाला आहे, तर ११ जणांची मुक्तता होणार आहे. माटुंगा रोड, माहीम जंक्शन, वांद्रे, सांताक्रूझ, जोगेश्वरी, बोरिवली आणि भाईंदर या ठिकाणी हे बॉम्बस्फोट झाले होते. दोषींपैकी ५ जणांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. या पाच जणांनी फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. उच्च न्यायालयाने त्यांचा अपील मान्य केला. फाशीची शिक्षा रद्द करू नये अशी मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. पण न्यायालायने दिलेल्या निर्णयामुळे राज्य सरकारला दणका बसला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते लॉयड्स मेटल्सच्या विविध प्रकल्पांचे उदघाटन

गडचिरोली:गडचिरोलीची स्टील सिटीच्या दिशेने वाटचाल होत असून येथील दलित, आदिवासी आणि अठरापगड जातीतील नागरिकांच्या जीवनात लोह उद्योग प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. त्यातून त्यांचे जीवनमानात बदल घडून गडचिरोलीचे परिवर्तन घडत आहे. पुढील काही वर्षात येथील नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होवून गडचिरोली राज्यातील पहिला जिल्हा बनविण्याचे आश्वसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी येथे लॉयड्स मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लिमिटेडच्या (ङचएङ) विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यात हेडरी येथील ५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या आयर्न ओर ग्राइंडिंग प्लांट, हेडरी ते कोनसरी दरम्यानची ८५ किलोमीटर लांबीची आणि १० दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेची स्लरी पाइपलाइन, आणि कोनसरी येथील ४ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या पेलेट प्रकल्पाचं उद्घाटन करण्यात आलं. याव्यतिरिक्त, कोनसरी येथे ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेचा एकात्मिक स्टील प्रकल्प, १०० खाटांचे रुग्णालय, सीबीएसई शाळा आणि सोमनपल्ली येथील लॉयड्सच्या कर्मचारी वसाहत या प्रकल्पांचं भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. गडचिरोलीला 'स्टील हब ऑफ इंडिया' बनवण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

यावेळी गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल, पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्त्या तुलसी मुंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे, कोनसारीचे सरपंच श्रीकांत पावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जल, जंगल, जमीन या गडचिरोलीच्या नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता विकास साधण्यावर मुख्यमंत्र्यांनी जोर दिला. ८० किलोमीटर लांबीची स्लरी पाइपलाइन ही प्रदूषण टाळण्यास मदत करेल, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात सुमारे ५५ टक्के घट होईल. राज्यातील पहिली आणि देशातील चौथी अशी ही स्लरी पाइपलाइन असल्याचं त्यांनी नमूद केलं.पुढील दोन वर्षांत एक कोटी झाडं लावून गडचिरोलीचं वनआच्छादन वाढवण्याचं उद्दिष्टही त्यांनी सांगितलं.लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी कार्यक्रमाचं प्रास्ताविक करून माहिती दिली.

## विनाफेरतपासणी दिव्यांगांना पदोन्नतीचा घाट

### कारवाई करण्याची मागणी

**दिव्यांगांना न्याय देण्यासाठी संशयित उमेदवारांची दिव्यांगत्व तपासणी करून त्यातील सत्यता पडताळणी आवश्यक आहे. यादीतील उमेदवारांचे दिव्यांगत्व व दिव्यांग प्रमाणपत्र पुर्नतपासणी करून त्याची पडताळणी करण्यात आली. तसेच बोगस दिव्यांग सापडल्यास त्यांच्यावर कार्यवाही करून बर्डतर्फ करावे. तसेच बोगस प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या शासकीय यंत्रणेतील आरोग्य विभागातील संबंधितांवर कारवाई करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही होत आहे.**

**गोंदिया:-** शिक्षण आयुक्तालयाच्यावतीने राज्यातील राज्य प्रकल्प संचालक, सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालकांना पत्र पाठवून दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर वैद्यकीय तपासणी करून खोट्या प्रमाणपत्रधारक उमेदवारावर कारवाई करण्याचे निर्देश २ जूनला दिले होते. मात्र या आदेशाकडे गोंदिया जिल्हा परिषदेच्या सर्वच विभागप्रमुखांनी दुर्लक्ष करीत दिव्यांग कर्मचाऱ्यांना पद्योन्नती देण्याचा घाट घाटल्याची चर्चा सुरू आहे.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांत दिव्यांग प्रमाणपत्रावर अनेक कर्मचारी नोकरीला लागले. यामध्ये अनेकांना न्यायालय, विभागीय आयुक्त, मंत्रालयापर्यंत जाऊनही खरे दिव्यांग व पात्र असतानाही योग्य तो न्याय मिळू शकला नाही. त्यांनी मात्र प्रशासनासमोर हतबल होत जसे होते त्याकडे बघूनच अन्याय सहन केला. त्यामुळे दिव्यांग आरक्षणातून पदोन्नती देताना सर्वांच्याच प्रमाणपत्राची खरी तपासणी होणे आवश्यक आहे. गोंदिया येथे गत ६-७ वर्षांपासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असल्याने वैद्यकीय महाविद्यालय बोर्डाकडून हे प्रमाणपत्र जिल्हा परिषद प्रशासनाने तपासून आणण्याचे निर्देश द्यायला हवे. जेणेकरून पात्र व खरोखरच दिव्यांग असलेल्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही.

यापूर्वीच्या सर्वच प्रमाणपत्रांची तपासणी होणे आवश्यक असून नोकरीला लागल्यानंतर अपघात झाल्याने दिव्यांगत्व आल्यानेही काहींनी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र जोडणे सुरू केले. त्यामुळे जन्मतः दिव्यांग असलेल्यांवर पद्योन्नतीच्यावेळी अशा प्रकरणामुळे अन्याय सहन करण्याची वेळ आली आहे. गोंदिया जिल्हा परिषदेत सध्या शिक्षण, सामान्य प्रशासन, वित्त विभाग, पाणीपुरवठा व आरोग्य विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीला



घेऊन विभागप्रमुख कारवाई करणार असल्याच्या चर्चेमुळे अन्याय होणार असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. ज्यांना आगामी काही दिवसात पदोन्नतीचा लाभ मिळणार आहे, अशा सर्वांच्या प्रमाणपत्रांची वैद्यकीय बोर्डाकडून निष्पक्ष तपासणी होणे गरजेचे झाले असून माजी आ. बच्चू कडू यांच्यावतीने राज्यात राबविलेल्या बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियानाला महत्त्व येणार आहे.

गरजूंवर अन्याय राज्यात मोठ्या प्रमाणात दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देऊन अनेक उमेदवार सरकारी व निमसरकारी सेवेत दाखल झाले. अलीकडे पूजा खेडकर यांनी यूपीएससीची फसवणूक करून आयएएस पद मिळिवले होते. त्याची यूपीएससीने दखल घेऊन खेडकरवर कारवाई केली. दिव्यांगाच्या बोगस प्रमाणपत्रामुळे खऱ्या दिव्यांगावर अन्याय होत आहे. यासाठी जात पडताळणी समितीच्या धर्तीवर दिव्यांग पडताळणी समिती स्थापन करून त्या सर्व प्रमाणपत्रांची तपासणी काटेकोरपणे होणे गरजेचे आहे.

## सावधान.. गंगाबाई रुग्णालयात जाताय प्रवेशद्वार परिसर घाण, दुर्गंधीने बरबटले



**गोंदिया:-** महिला व बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी असलेल्या येथील बाई गंगाबाई महिला व बाल रुग्णालयात प्रवेश करताना घाण व उग्र दुर्गंधीला सामोरे जावे लागते. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोरील परिसरात प्रचंड प्रमाणात घाण, कचरा साचून आहे. येथे अस्वच्छतेने कहर केला आहे. नजर जाईल तिकडे घाणच घाण दिसून येते. परिणामी, या परिसरात वावरताना नाकावर रुमाल ठेवावीच लागते. दुर्गंधीने कळस गाठला असताना पालिकेच्या स्वच्छता यंत्रणेला सफाईचा विसर का पडला असावा, असा प्रश्न रुग्णालयात येजा करणारे उपस्थित करीत आहेत.

गर्भवती, प्रसुत, स्तनदा माता, नवजात बालकांची काळजी घेणारे एकमेव रुग्णालय अशी येथील बाई गंगाबाई महिला व बाल रुग्णालयाची ओळख आहे. गोंदियाच नव्हे, तर सीमावरती मध्य प्रदेश, छत्तीसगड राज्यातील महिला, बालक या रुग्णालयात औषधोपचारासाठी येतात. महिन्याला ७०० ते ८०० महिलांची प्रसुती येथे होते. महिला व बाल रुग्णांच्या बाबतीत हे रुग्णालय संवेदनशील आहे. अधिकारी, कमचारी रुग्णांची पुरेपूर काळजी घेतात. रुग्णालयाची दैनिक स्वच्छता केली जाते. येथील कचऱ्याची योग्य विल्हेवाटही लावली जाते. मात्र रुग्णालयाच्या आवाराबाहेर मुख्य प्रवेश द्वारासमोरच प्रचंड घाण, कचरा साठून आहे. समोरील परिसर नगर पालिका प्रशासनाच्या हद्दित येतो. स्वच्छता राखण्याची जबाबदारी पालिकेची आहे. मात्र पालिकेची स्व्च्छता यंत्रणा संवेदनशील नाही, असेच दिसून येते. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर अस्वच्छतेने कहर केला आहे. सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्या केरकचऱ्याने तुंबल्या आहेत. परिणामी, डासांची पैदासही मोठ्या प्रमाणा वाढली आहे. याच परिसरातील डबक्यांमध्ये साचलेल्या गढूळ पाण्यात आणि आसपासच्या परिसरात डुकरांचाही प्रचंड वावर आहे. डबक्यातील गढूळ पाणी व कुजलेल्या केरकचऱ्याचा उग्र वास येत असल्याने आरोग्याची गंभीर समस्याही येथे निर्माण झाली आहे. घाणीने बरबरटलेल्या या परिसरात डुकरांनी जम बसविला आहे. हे डुक्कर घोळक्याने दिवसभर रुग्णालय परिसर पिंजून काढतात. घाण इतरत्र पसरवितात. त्यामुळे रुग्णालय आवारात प्रवेश करताना घाण व दुर्गंधीला सामोरे जावे लागते. उष्टे, शिळे अन्न कुंडीतून बाहेर काढून किंबहुना कुंडी पालथी घालून त्या अन्नावर डुक्कर ताव मारतात. हे अन्न खाण्यासाठी डुकरांमध्ये पैज लागल्याचे दिसते. या पैजेत अन्न इतरत्र विखूरला जात असून, परिसरात घाणच घाण पसरत असते. असे असले तरी स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या पालिकेने याकडे दुर्लक्ष केले आहे. दुर्गंधी आणि घाणीच्या सामराज्यामुळे नाकावर रुमाल ठेऊनच रुग्णालयात जावे लागते. एवढेच काय, या दुर्गंधीमुळे रुग्णालयात भरती महिला, नवजात बालके आणि रुग्णांचे नातेवाइक यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.




### धान खरेदीचे उद्दिष्ट ठरवितांना पेच

**गोंदिया-**जिल्ह्यात सुरू असलेल्या धान खरेदी योजनेने शासन, प्रशासनाच्या नाकी नऊ आणले आहे. सध्या ही योजना चांगलीच चर्चेत आहे. लागवड क्षेत्राच्या तुलनेत धान खरेदीचे मिळालेले अल्प लक्ष्यांक खरेदी यंत्रणेच्या जिव्हारी लागले आहे. जिल्हा पणन कार्यालयाला दिलेले खरेदीचे उद्दिष्ट दोनदा पूर्ण झाले. आता तिर्स ?यांदा जिल्ह्याला मिळालेल्या अत्यल्प उद्दिष्टामुळे १८६ खरेदी केंद्रांना उद्दिष्ट कसे वाटून द्यावे, असा पेच जिल्हा पणन कार्यालयापुढे निर्माण झाला आहे.

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यातील काही भागात खरीप व उन्हाळी हंगामात धानाचे उत्पादन घेतले जाते. धान खरेदीसाठी केंद्र शासनाची किमान आधारभूत खरेदी योजना आहे. योजनेअंतर्गत जिल्हा पणन कार्यालय व आदिवासी विकास महामंडाच्या उपअभिकर्ता संस्थाद्वारे धान खरेदी केली जाते.

## अनुसूचित जमाती कल्याण समिती २९ ते ३१ जुलैपर्यंत जिल्ह्याच्या दौऱ्यावर

### १६ समिती सदस्यांसह ११ अधिकारी व कर्मचारी

**अनुसूचित जमाती कल्याण समिती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. या समितीमध्ये समिती प्रमुखासह एकूण १६ आमदारांचा समावेश आहे. त्याच बरोबर ३ सनदी अधिकारी, ३ प्रतीवेदक, स्विह्यसहाय्यक व ४ कर्मचारी असे एकूण ११ अधिकारी, कर्मचारी देखील राहणार आहेत.**

### समिती सदस्य

**समिती प्रमुख - आ. दौलत दरोडा, आ. हरिषचंद्र भोये, आ. मिलींद नरोटे, आ. केवलराम काळे, आ. राजु तोडसाम, आ. राजेश पाडवी, आ. शांताराम मोळे, आ. श्रीमती मंजुळा गावित, आ. हिरामन कोसकर, आ. आदित्य ठाकरे, आ. रामदास मसराम, आ. श्रीमती उमा खापरे, आ. इद्रिस नायककवळी, आ. राजेश राठोड, आ. सुनिल शिंदे, आ. विनोद निकोळे यांचा समितीमध्ये समावेश आहे.**

**गोंदिया :-** महाराष्ट्र विधान मंडळ अनुसूचित जमाती कल्याण समिती दि.२९ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून सदर समितीचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. २९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता शसकीय विश्रामगृह गोंदिया येथे एकत्र जमणे. सकाळी ९.३० ते १० पर्यंत शासकीय विश्रामगृह गोंदिया येथे समितीची जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्यासोबत अनूसूचित जमातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व अडचणीबाबत अनौपचारीक चर्चा. सकाळी १० ते दुपारी ११.३० पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील नगरपरिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष, जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात तसेच शासकीय यंत्रणांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

सकाळी ११.३० ते दुपारी १२ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण, अनुशेष व जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा. दुपारी १२ ते १२.३० पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गोंदिया परिमंडळ कार्यालयांतर्गत येत असलेल्या गोंदिया शहर व गोंदिया ग्रामीण या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण, अनुशेष आणि जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

दुपारी १२.३० ते १ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे राज्य उत्पादन शुल्क कार्यालय गोंदिया कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण, अनुशेष आणि जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा. दुपारी २ ते ३ पर्यंत राखीव. दुपारी ३ ते सायंकाळी ५ पर्यंत जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया येथे जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष, जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात तसेच जिल्हा परिषद यंत्रणांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

सायंकाळी ५ ते ६.३० पर्यंत जिल्हा परिषद गोंदिया येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा. त्यानंतर शासकीय विश्रामगृह गोंदिया येथे मुक्काम.

३० जुलै रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत गोंदिया जिल्ह्यातील प्रकल्प कार्यालयांतर्गत येत असलेल्या तालुकानिहाय आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा/वसतिगृह तसेच शासनाच्या व जिल्हा परिषद यंत्रणाकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या योजनांबाबत केलेल्या कामांना भेटी देऊन संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

३१ जुलै रोजी सकाळी १० ते ११ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गोंदिया येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण अनुशेष व जात पडताळणी विषयक बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा.

सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे समितीने जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळा/वसतिगृह तसेच शासनाच्या व जिल्हा परिषद यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात आलेल्या योजनांबाबत कामांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात करावयाची कार्यवाही तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व पोलीस अधीक्षक या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, आरक्षण व अनुशेष याबाबत झालेल्या बैठकीच्यावेळी उपस्थित झालेल्या मुद्यांच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही यासंदर्भात तसेच जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक व चर्चा.

## नवनिर्मित गोंदिया-बालाघाट महामार्गाचे स्लोपिंग खचले

### दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू

**पहिल्याच पावसात स्लोपिंग खचल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयावर आणि कामाच्या दर्जावर तीव्र टीका सुरू झाली आहे. त्यावर संबंधित कंत्राटदाराने १५ ते २० जेसीबी आणि पोकलेन मशीनच्या साहाय्याने स्लोपिंग दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.**

**गोंदिया:-** गोंदिया-बालाघाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४३ च्या ४१.२१ किमी रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, लोकार्पणाआधीच महामार्गाची स्लोपिंग खचली असून काही अंडरपास पुलांना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.





केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या भारतमाला योजनेंतर्गत मंजूर झालेल्या या चौपदरी महामार्गाचे काम जानेवारी २०२६ मध्ये पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. एकूण ११०६ कोटी रुपयांच्या या प्रकल्पांतर्गत बालाघाट-गोंदिया मार्गासाठी सुमारे ५४७ कोटी रुपये खर्च होणार आहेत. बालाघाट गोंदिया राष्ट्रीय महामार्गाचे काम जवळपास पूर्ण झाले. काही ठिकाणी किरकोळ कामे शिल्लक आहेत. महामार्गावर २ आरओबी आणि २१ अंडरपास असून, त्यांचेही काम

जवळपास पूर्ण झाले आहे. या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला स्लोपिंग तयार करण्यात आली आहे. मात्र, दहा दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे भंभोळी आणि रजेगावजवळील काही भागात तडे गेले आहेत, तर काही स्लोपिंग वाहून गेली आहे. तसेच, महामार्गालगत बांधण्यात आलेले गॉगलई येथील बसस्थानकसुद्धा खचण्याच्या मार्गावर आहे. बालाघाट गोंदिया राष्ट्रीय महामार्गाचे काम मुदतीच्या आधीच पूर्ण होत आहे. त्यामुळे या महामार्गाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची एक चमू चार पाच दिवसांपूर्वी येणार होती. दरम्यान स्लोपिंग खचल्याने हरियाणा येथील कालू वालिया यांच्या बांधकाम कंपनीमागे आता चौकशीचा ससेमिरा लागला आहे. त्यामुळे कंपनीला मिळणारा १६ कोटी रुपयांचा बोनस संकटात आला आहे.

या ४१.२१ किमीच्या बांधकामावर ५४७ कोटी खर्च केले जाणार आहेत. पण लोकार्पणापूर्वीच स्लोपिंग खचल्याने ती दुरुस्त करण्याचा भुर्दंड संबंधित बांधकाम करणाऱ्या हरयाणा येथील कंपनीला बसला. शिवाय कंपनीवर यामुळे दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता आहे. ही बांधकाम कंपनी केंद्रातील एका बड्या नेत्याच्या नातेवाईकाची असल्याची माहिती आहे. त्यामुळे कदाचित या प्रकाराची तेवढ्या गांभीर्याने दखल घेतली जाणार नाही.

नागपूर-रायपूर या राष्ट्रीय महामार्गावरील मासुलकसा घाटाजवळ पूल व रस्ता तयार करण्याचे काम अग्रवाल ग्लोबल या बांधकाम कंपनीने केले. या कंपनीने तयार केलेला रस्ता व पुलाचे बांधकाम नेहमीच वादग्रस्त राहिले. गोंदिया जिल्ह्यात पहिल्याच झालेल्या मुसळधार पावसाने मासुलकसा घाटाजवळील रस्ता खचला तर यापूर्वी देखील पुलाची साईडिंग खचली होती. या राष्ट्रीय महामार्गावर सतत अवजड वाहनांची वाहतूक सुरु असते. अशात या रस्त्याच्या कामाची गुणवत्ता जर एवढी सुमार असेल आणि बांधकामानंतर सहा महिन्यांतच जर रस्ता खचत असेल तर या राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कितपत सुरक्षित असणार, याचा विचार न केलेलाच बरा. यामुळे राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत केले जाणारे दावे कितपत खरे हे विचार करण्यास भाग पाडते.

## संपादकीय

### पावसाच्या पॅटर्नमधील बदल चिंताजनक!

भारतात पूर्वी मुसळधार पावसामुळे अनेक दिवस जनजीवन विस्कळीत होत असे. सूर्य दिसत नसे. काम थांबत असे. वाहतुकीवर मोठा परिणाम होत असे; परंतु गेल्या तीन दशकांत मॉन्सूनचा पॅटर्न इतका बदलला आहे की, पाऊस सतत पडत नाही. काही ठिकाणी काही तासांमध्ये इतका मुसळधार पाऊस पडतो की पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. हे चित्र का बदलले आहे, याचा विचार करायला हवा.

भारतात १९५० ते १९८०च्या दशकापर्यंत अनेक भागांत, विशेषतः पश्चिम घाट (जसे की महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ), ईशान्य भारत (आसाम, मेघालय) आणि गंगेच्या मैदानात जून ते सप्टेंबर या काळात पाच ते दहा दिवस सतत हलका ते मध्यम पाऊस पडणे सामान्य होते. काही ठिकाणी हा कालावधी आणखी जास्त, १५-२० दिवस असू शकतो. पूर्वी मॉन्सूनचा पॅटर्न अधिक स्थिर आणि समान रीतीने वितरित केला जात असे. सतत ढग असायचे. पाऊस अनेक दिवस अधूनमधून किंवा हलक्या रिमझिम पावसाच्या स्वरूपात सुरू असायचा. हा तो काळ होता, जेव्हा लोक म्हणायचे की इतका पाऊस पडत होता की, बरेच दिवस सूर्य दिसत नव्हता. महात्मा गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात आईच्या उपवासाबद्दल लिहिले आहे.

महात्मा गांधींच्या आई पुतळीबाई चातुर्मासात सूर्यदर्शन उपवास करत असत. या उपवासात त्या सूर्याला पाहिल्याशिवाय जेवत नव्हत्या. गांधीजींनी त्यांच्या "सत्याच्या प्रयोगांची कहाणी' या आत्मचरित्रात याचा उल्लेख केला आहे. त्यांनी लिहिले आहे की पावसाळ्यात बरेच दिवस ढग राहतात आणि सूर्य दिसत नव्हता, तेव्हा त्यांची आई दोन-तीन दिवस जेवत नव्हती. त्या काळात तरुण मोहनदास (गांधी) सकाळपासूनच आकाशाकडे लक्ष ठेवत; जेणेकरून सूर्य दिसताच ते आईला कळवू शकतील आणि ती उपवास सोडू शकेल. गांधीजींच्या आत्मचरित्रात लिहिलेली ही बाब १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला गुजरातमधील पोरबंदरसारख्या भागांशी संबंधित आहे. तिथे पावसाळ्यात सहा-सात दिवस सतत ढग आणि पाऊस पडणे सामान्य होते.

त्या काळात साधारणपणे पावसाळ्याच्या शिखरकाळात अशी परिस्थिती वारंवार दिसून येत असे. भारतातील ग्रामीण भागात "आठवडाभर पाऊस' किंवा "सतत मुसळधार पाऊस' पडत असे. त्याचा शेती आणि जीवनशैलीवर परिणाम होत असे. भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) जुन्या रेकॉर्डनुसार (१९०१-१९८०) सामान्य पावसाळ्यात भारतातील अनेक भागात ५०-१०० पावसाळी दिवसांची नोंद होते. त्यापैकी बऱ्याच वेळा पाच-दहा दिवस सतत पाऊस पडत असे. पश्चिम घाट (महाराष्ट्र, गोवा, केरळ) भागात जून-जुलैमध्ये ७-१५ दिवस सतत पाऊस पडल्याच्या नोंदी आढळतात. ईशान्य भारत-मेघालयसारख्या भागात २०-३० दिवस अधूनमधून पाऊस पडणे सामान्य होते. उत्तर भारतात (उत्तर प्रदेश, बिहार) पाच-दहा दिवस वारंवार पावसाचा कालावधी येत असे.

पूर्वीच्या तुलनेत आता हवामान बदलामुळे पावसाचा पॅटर्न बदलला आहे. आता दीर्घकालीन हलका पाऊस कमी पडतो. त्याऐवजी थोड्याच वेळात मुसळधार पाऊस पडतो. गेल्या तीन ते चार दशकांमध्ये पावसाच्या पद्धतीत बदल होण्यामागे अनेक कारणे आहेत. तथापि, हा बदल केवळ भारतासाठी नाही तर, संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय आहे. गेल्या काही दशकांमध्ये भारतासह जगभरात सरासरी तापमान वाढले. त्यामुळे हवामानामध्ये असामान्यता निर्माण झाली आहे. तापमानात वाढ झाल्यामुळे वातावरणातील आर्द्रता क्षमता वाढते. त्यामुळे कधीकधी काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस पडतो. पॅसिफिक महासागरात होणाऱ्या "एल निनो'सारख्या घटनांमुळे भारतात मॉन्सून कमकुवत होऊ शकतो. परिणामी, पावसाचा कालावधी आणि प्रमाणही कमी होते. पूर्वी हे प्रमाण कमी होते; परंतु आता त्यांचा परिणाम अधिक दिसून येतो. आता अवघ्या काही तासांमध्ये इतका मुसळधार पाऊस पडतो की, पूरसदृश परिस्थिती निर्माण होते.

अलीकडच्या काही वर्षांमध्ये मॉन्सून कधी लवकर येतो, कधी उशिरा येतो. कधी कधी मॉन्सून एकाच दिवसात अनेक राज्यांमध्ये पोहोचतो. त्यामुळे पावसाचे वितरण असमान होते. शहरीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचे शोषण यांचा स्थानिक हवामान आणि पावसाच्या चक्रावरही परिणाम होतो. भारतात रिमझिम किंवा हलका पाऊस कमी होत आहे. मॉन्सूनचे वारे आता पूर्वीसारखे सतत ओलावा आणत नाहीत. त्यामुळे रिमझिम पावसाचा कालावधी कमी झाला. ङ्गआयएमडीफच्या (१९५१-२०१५) अभ्यासानुसार भारतात हलक्या पावसासह दिवसांच्या संख्येत १०-१५ टक्के घट झाली, तर मुसळधार पाऊस २०-३० टक्के वाढला. पश्चिम घाट आणि ईशान्य भारतात अजूनही हलका पाऊस पडतो; परंतु त्याचा कालावधी आणि नियमितता पूर्वीपेक्षा कमी आहे. मेघालयसारख्या भागात अजूनही रिमझिम पाऊस पडतो; परंतु एकूणच कमी कालावधीत पडतो.

मध्य आणि उत्तर भारतात हलका पाऊस लक्षणीयरीत्या कमी झाला. त्याऐवजी पूर किंवा दुष्काळासारख्या हवामान घटनांमध्ये वाढ झाली. तामिळनाडू आणि केरळमध्ये अजूनही मॉन्सून आणि ईशान्य मॉन्सूनदरम्यान हलका पाऊस पडतो; परंतु सातत्याचा अभाव आहे. या वर्षी मुसळधार पावसामुळे मे महिन्यात हवामान थंड झाले. फेब्रुवारीमध्ये अचानक हिवाळ्याची जागा वसंत ऋतूने घेतली. जूनमध्ये पावसानंतर उष्णतेची लाट आली. मे महिन्यात उष्णतेच्या लाटांऐवजी अनेकांनी थंड वाऱ्याचा आनंद घेतला. काही भागांमध्ये उष्णतेऐवजी वेगळ्या पावसाचा अनुभव आला. नंतर मान्सूनची प्रगती थांबली. यासाठी जबाबदार असलेल्या पश्चिमी विक्षोभां(वेस्टर्न डिस्टर्बन्स)ची वारंवारता कमी झाली. जूनच्या पहिल्या आठवड्यापासून पंजाब, हरियाणा, चंदिगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेशचा काही भाग आणि पूर्व राजस्थान, दक्षिण उत्तर प्रदेश आणि वायव्य मध्य प्रदेश या भागांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला.

"कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस'ने जून २०२३ मध्ये जाहीर केले होते की, सरासरी जागतिक तापमान अनेक दिवस औद्योगिकपूर्व पातळीपेक्षा १.५ अंश सेल्सिअसने जास्त होते. २०२४ मध्ये जागतिक तापमानवाढीने लक्ष्मणरेखा १.५ अंश ओलांडली असल्याचे पुन्हा एकदा सांगितले गेले. "शिफ्टिंग झोन ऑफ ऑक्युरन्स ऑफ एक्सट्रीम वेदर इव्हेंट्स-हीट वेव्हज'च्या अलीकडील अभ्यासानुसार उष्णतेच्या लाटा आता राजस्थान किंवा विदर्भापुरत्या मर्यादित नाहीत. अरुणाचल प्रदेश, केरळ आणि जम्मू आणि काश्मीरसारख्या पारंपरिकपणे थंड मानल्या जाणाऱ्या राज्यांमध्येही गेल्या दोन दशकांमध्ये उष्णतेच्या लाटा आल्या आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषदेचा अहवालदेखील याची पुष्टी करतो. अलीकडच्या एका मूल्यांकनानुसार उत्तराखंडच्या पर्वतरांगांमध्ये २७ टक्के अन्नधान्य आणि तेलबिया पिकांचे नुकसान होऊन उत्पादन १५ टक्क्यांनी कमी झाले. पाच वर्षांमध्ये बटाट्याचे उत्पादन ७० टक्क्यांनी कमी झाले. त्यात अल्मोडा आणि रुद्रप्रयागमध्ये सर्वात मोठी घट झाली.

भारतीय हवामान विभागाचे माजी महासंचालक डॉ. के. जे. रमेश यांच्या मते, हवामानबदलामुळे आग्नेय वातावरणातील आर्द्रतेची पातळी वाढली आहे. तापमानात प्रत्येक एक अंश वाढीमुळे हवेची पाण्याची वाफ धरून ठेवण्याची क्षमता सात टक्क्यांनी वाढली. सर्व डोंगराळ राज्यांमध्ये तापमानात दोन ते चार अंश वाढ झाली. ङ्गआयपीसीसीफअहवालात वेट-बल्ब तापमानाचा उल्लेख आहे. ते तापमान मोजताना मुळात उष्णता आणि आर्द्रता जोडते. सामान्य माणसासाठी, ३१ अंश सेल्सिअसचे वेट-बल्ब तापमान अत्यंत धोकादायक असते. ३५ अंश सेल्सिअस तापमानात सावलीत विश्रांती घेणाऱ्या निरोगी प्रौढ व्यक्तीलादेखील सुमारे सहा तासांपेक्षा जास्त काळ जगणे कठीण होते.

नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, दक्षिण भारतातील जोरदार वारे आर्द्रता चांगल्या प्रकारे पसरवत आहेत. हे हवेतील मोठ्या प्रमाणात बदलांचे लक्षण आहे, जे मॉन्सून प्रणालींच्या हालचालीवरदेखील परिणाम करू शकतात. मॉन्सूनमधील हे घातक बदल रोखण्यासाठी आता पर्यावरण संरक्षणावर अधिक भर दिला पाहिजे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला रुग्णांसाठी जीवनदायी!

**गोंदिया:-** जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आशेचा नवा किरण ठरला आहे. या निधीच्या माध्यमातून जवळपास २६ लक्ष ३० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य रुग्णांना देण्यात आले असून उपचारासाठी पुरेसा आर्थिक आधार नसलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या निधीतून कर्करोग, हृदयविकार, मेंदूविकार, नवजात बालकांचे गंभीर आजार, मूत्रपिंड व लिव्हर प्रत्यारोपण, अपघातातील शस्त्रक्रिया, महागड्या ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया अशा गंभीर व जीवघेण्या आजारांवरील उपचारासाठी मदत दिली जाते.

सदर कक्ष ( मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय सहायता कक्ष) हा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या संकल्पनेतुन राज्यातील प्रत्येक जिल्हयांमध्ये स्थापन करण्यात आलेला आहे.

गोंदिया येथे जिल्हाधिकारी कार्यालयात पहील्या मजल्यावर हा कक्ष सुरु असुन जिल्हाधिकरी प्रजित नायर तसेच निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांचे मार्गदर्शन रुग्णांना मिळत आहे. आवश्यक सर्व साहित्य व कक्षाच्या निर्माणमध्ये यांची महत्वपुर्ण मदत झाली आहे.

१ मे २०२५ रोजी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे उदघाटन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, सहाय्यक अधिक्षक संजय धार्मिक तसेच कक्षातील अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकेश येरपुडे, समाजसेवा अधिक्षक मारोती कुचनकर, लिपीक स्मिता शेटे तसेच विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.




दिनांक १ मे २०२५ पासुन कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकेश येरपुडे, वैद्यकीय समाजसेवा अधिक्षक मारोती कुचनकर, लिपीक स्मिता शेटे या कक्षामध्ये कार्यरत आहेत. तसेच अधिक माहितीकरीता रुग्णांनी ९५१८९८४२९२, ९९६०७२२२६८ या मोबाईल क्रमांकाशी संपर्क साधावा.

**रुग्णांना देण्यात आलेली मदत पुढीलप्रमाणे -**

## रुग्णांना २६ लक्ष ३० हजार रुपयांची मदत

१.जानेवारी - १ अर्ज ५० हजार रुपये

२. फेब्रुवारी - ३ अर्जांना २ लाख ४० हजार रुपये

३. मार्च - ७ अर्जांना ५ लाख २० हजार रुपये

४. एप्रिल - ७ अर्जांना ५ लाख २० हजार रुपये

५. मे - १५ अर्जांना ११ लाख ५० हजार रुपये

६. जून - २ अर्जांना १ लाख ५० हजार रुपये,

१३ जुलैपर्यंत - ३५ अर्जांना २६ लाख ३० हजार रुपये.

१ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कक्ष सुरू झाल्यानंतर मदतीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. रुग्ण दवाखान्यात भरती झाल्यानंतर दोन दिवसांत अर्ज दाखल केल्यास व कागदपत्रे पूर्ण असल्यास पाच दिवसांतच निधी संबंधित रुग्णालयाच्या खात्यात जमा होतो.

**अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया**

अर्जदारांनी निधीसाठी अर्ज करताना काही आवश्यक कागदपत्रे जमा करावी लागतात. त्यामध्ये विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्याचा स्थाननिश्चित (जीओ टॅग) केलेले छायाचित्रे, उपचार खर्चाचे अंदाजपत्रक (खासगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक), तहसीलदार यांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला (१ लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असल्याचे), आधारकार्ड, आजाराशी संबंधित निदानात्मक कागदपत्रे तसेच अपघातग्रस्त रुग्णासाठी पोलिसांचा एफआयआर, प्रत्यारोपणाच्या बाबतीत विभागीय समितीचा अहवाल अशी कागदपत्रे बंधनकारक आहेत.

अर्जदारांनी ही कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथील मुख्यमंत्री सहाय्यता कक्षात थेट जमा करावीत किंवा ई-मेलद्वारे पाठवावीत. अर्ज केल्यानंतर मिळालेल्या नोंदणी क्रमांकाच्या साहाय्याने htt{s://cmrf.maharashtra.gov.in/alicantEnquiryF$orm.action या संकेतस्थळावर अर्जाची सद्यस्थिती तपासता येते.

जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी या वैद्यकीय मदत उपक्रमाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले आहे.

# मोबदल्यापासून शेतकरी वंचित गेल इंडिया कंपनीचा प्रताप

**गोंदिया :-** जिल्ह्यातून गेल इंडिया लि.कंपनीची गॅस पाईप लाईन जात आहे. यासाठी युध्दपातळीवर काम सुरू आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून ही पाईपलाईन जात आहे. त्यातच काही शेतकऱ्यांना त्याचा मोबदला देण्यात आला असला तरी ज्या ठिकाणाहून पाईप लाईन गेली आहे. ती जमिन निरुपयोगी झाली आहे, तर दुसरीकडे मांडवी, बेलाटी, कवलेवाडा आदी परिसरातील गॅस पाईप लाईनचे काम पुर्ण झाले आहे मात्र शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला मिळालेला नाही. परिणामी निरुपयोगी जमिन व मोबादला न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.



सविस्तर असे की, तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा येथील शेतकऱ्यांच्या शेतातून गेल इंडिया कंपनीची मुंबई - नागपूर ते झारसुकडा गॅस पाइपलाइनचे काम सुरू आहे. याकरिता अधिग्रहित करण्यात येत असलेल्या जमिनीचा मोबदला तज्ज्ञाकडून जमिनीच्या बाजारभावाचे किमतीच्या फक्त १० टक्के रक्कम दिली जाणार आहे. जी बाधीत क्षेत्राच्या तुलनेत खुप कमी आहे. गेल कंपनीने वीस मीटर रूंद पट्टीची जमीन बाधित क्षेत्र म्हणून वापर करण्याचा हक्क बळजबरीने संपादित केली आहे.

२० मीटर रूंदीच्या पट्टीत शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. गुरांचा गोठा, तळे, विहीरी, पाण्याचा साठा, धरण किंवा कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही. आपल्याच शेतात कोणत्याही प्रकारचे झाडे लावता येणार नाही. व तसे करण्याचा प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मुभाही त्या कायद्यात आहे. त्यामुळे ती जमिन निरुपयोगी ठरणार आहे. या पाईपलाईनच्या कामाला घेवून परिसरातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. त्यातच कवलेवाडा येथील शेतकरी आपली शेती गेल कंपनीला द्यायला तयार नव्हते, याविषयी शेतकऱ्यांशी तडजोड करायला उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी ( म.राज्य ) गेल इंडिया व त्यांची संपूर्ण टीम गावात आली होती.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतात भविष्यात करणार असलेल्या योजना सांगितल्या व होणाऱ्या नुकसानीची योग्य ती भरपाई देण्याची व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नौकरी मिळवून देण्याची मागणी केली. पण त्या मागणीकडेही यंत्रणेसह जिल्हा प्रशासनानेही दुर्लक्ष केले. परिणामी आजही शेतकऱ्यांना जमिनीची मोबदला मिळालेला नाही. या बाबीला ८ महिलाचा अवधी लोटला. मांडवी, बेलाटी, कवलेवाडा आदी गावातील पाईप लाईनचे कामही पुर्ण झाले मात्र मोबदला न मिळाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहे. तेव्हा लोकप्रतिनिधींनी या विषयाकडे लक्ष देवून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी गामस्यांनी केली आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**तिरोडा-**महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तिरोडा/गोरेगाव/दवाणीवाडा येथे आमदार विजय रहांगडाले यांच्या पुढाकाराने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्यांनी स्वतः रक्तदान करत समाजात एक सकारात्मक संदेश दिला.

सदर रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने युवक, महिला आणि नागरिकांनी सहभाग घेतला. "सेवा हीच खरी शुभेच्छा" या भावनेतून आयोजित या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

रक्तदानानंतर आमदार विजय रहांगडाले यांनी सांगितले की, देवेंद्र फडणवीस हे केवळ एक यशस्वी मुख्यमंत्रीच नाहीत, तर हजारो कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे नेतृत्व आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान केल्याचा मला आनंद आहे.या उपक्रमात तिरोडा नगरपरिषद, गोरेगाव तालुका भाजपा पदाधिकारी, विविध सामाजिक संस्था व युवक मंडळांनी सहकार्य केले. रक्त संकलनासाठी अधिकृत रक्तपेढीच्या प्रतिनिधींनी संपूर्ण वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या.सामाजिक जाणीवेतून आणि लोकहितासाठी केलेले हे रक्तदान शिबिर एक आदर्श उपक्रम ठरला आहे.यावेळी प्रामुख्याने भाजप जिल्हाध्यक्ष सीताबाई रहांगडाले, पंकज रहांगडाले, प.स.सभापती चित्रलेखा चौधरी,भाजप गोरेगाव अध्यक्ष अनंता ठाकरे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.




# शूर योद्धा शहाजीराजे भोसले

कोणताही महापुरुष घडतो तेव्हा त्या महापुरुषांच्या घडण्यामागे त्या महापुरुषांच्या आई-वडिलांचा मोठा हात असतो . शिवाजी महाराज घडले त्यामागे जेवढा जिजाबाईचा हात आहे तेवढाच शहाजीराजांचा सुद्धा हात आहे पण इथे जेवढी जिजाबाईच्या कर्तृत्वाची होते , तेवढी चर्चा शहाजी महाराजांच्या कर्तुत्वाची होत नाही होत नाही .हा एक प्रकारे शहाजीराजांवरती अन्याय आहे. म्हणून या लेखात शहाजी महाराजांचा कर्तुत्वाचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

देवगिरी येथील भोसले घराणे हे निजामशाहीच्या सैन्यात नोकरीत होते या घराण्यात मालोजींचा जन्म झाला मालोजी भोसले हे अहमदनगरच्या निजामशाहीत ५००० स्वारांचे मनसबदार होते ते शहाशरीफ या मुसलमान पीराचे भक्त होते त्यांना दोन मुले झाली तेव्हा त्यांनी मोठ्या मुलाचे नाव शहाजी ठेवले व लहान मुलाचे नाव शरीफजी ठेवले.

सन १६०० सोळाव्या शतकाच्या अखेरीस सम्राट अकबर याने त्यांच्या साम्राज्य विस्तार धोरणानुसार अहमदनगरच्या निजामशाहीवर आक्रमण करून अहमदनगर ताब्यात घेतले पण निजामशाहीचा शूर सरदार मलिक अंबर याने लवकरच अहमदनगर चा किल्ला परत आपल्या ताब्यात घेतला . याच दरम्यान इसवीसन १६०० मध्ये शहाजींचा जन्म झाला .

इसवी सन १६०५ मध्ये

सम्राट अकबरांचा फतेपुर सिक्री येथे मृत्यू झाला .

इसवीसन १६११ मध्ये

मालोजीचा मुलगा शहाजी व सिंदखेडचे देशमुख लघुजी जाधवाची कन्या जिजाऊ चा विवाह झाला .याच दरम्यान शहाजीचा चुलत भाऊ संभाजी व

लखुजी जाधव यांचा मुलगा व जिजाऊचा सख्खा भाऊ दत्ताजी यांचे भांडण झाले यात संभाजी कडून दत्ताजी मारला गेला .

ही बातमी लखोजी जाधवास समजतात ते भोसल्यावर चाल करून गेले व शहाजीचा चुलत भाऊ संभाजीस ठार केले व सख्खे जावई शहाजी यास जखमी केले .

या प्रकरणाला जाधव विरुद्ध भोसले असे स्वरूप आले निजामशहाने स्वतः या प्रकरणात मध्यस्थी करून हे प्रकरण थांबवले.

यानंतर शहाजी यांचे वर्चस्व निजामशहाच्या दरबारात वाढू लागले ते लखुजी जाधवास सहन न होऊन लखुजी जाधवांनी निजामशाहीची नोकरी सोडली व २४००० स्वारांची मनसब मिळवून दिल्लीच्या जहांगीर बादशहाची म्हणजेच मोगलशहाची नोकरी पत्करली .

शहाजीला जिजाबाई पासून तीन अपत्ये झालीत

१) पहिला संभाजी सन १६२१

२) दुसरा शिवाजी सन १६३०

३) तिसरी मुलगी

शहाजींची दुसरी पत्नी तुकाबाई मोहिते होय. या तुकाबाई मोहिते पासून सन १६३२ साली शहाजींना एकोजी उर्फ व्यंकोजी हा पुत्र झाला हे शिवाजींचे सावत्र भाऊ होत. यांनी नंतर तंजावर येथे स्वतंत्र मराठा राज्य स्थापन केले

इसवी सन १६२४ मोगल बादशाह जहांगीर याने निजामशाहीवर स्वारी केली पण मलिक अंबरने (निजामशाही )मोघलांचा पराभव केला या लढाईत शहाजीचा लहान भाऊ शरीफजी मारल्या गेला.

या लढाईमुळे शहाजीचे वर्चस्व निजामशाहीत वाढले पण मलिक अंबरला शहाजी खुपू लागला व निजामशाहीत शहाजीचे बरेच शत्रू निर्माण झाले परिस्थिती प्रतिकूल पाहून शहाजीने निजामशहाची नोकरी सोडली व इब्राहिम आदिलशहा ( बिजापूर ,कर्नाटकची) नोकरी पत्करली आजूबाजूच्या प्रदेशात स्वाऱ्या व लुटालुट करून आदिलशहास अमाप पैसा मिळवून दिला .

मे १६२६ अहमदनगर निजामशाहीचा मुख्य पराक्रमी सेनापती मालिक अंबर मरण पावला. ऑगस्ट १६२६ विजापूरचा आदिलशहा इब्राहिम मरण पावला.

ऑक्टोबर १६२६राजौरी येथे मोगलशाहीचा बादशहा जहांगीर मरण पावला व शहाजहान गादीवर आला .

निजामशाही आणि आदिलशाही म्हणजेच अहमदनगर आणि विजापूर च्या झगड्यात दोन्ही पक्षातील मराठी सरदार मोरे ,जेधे, बांदल ,खोपडे ,दळवी ,सुर्वे यांचे महत्त्व वाढले व यांनाही स्वतःच्या अस्तित्वाची व महत्त्वाची जाणीव होऊ लागली .

निजामशाहीचा शूर सेनापती मलिकंबर मरण पावल्यामुळे तिथे पोकळी निर्माण झाली त्याचा फायदा घेण्यासाठी शहाजीराजे बिजापूरची आदिलशाही सोडून निजामशाहीत ( अहमदनगर)परत आले .



इसवी सन १६२९ जुन्नर( पुणे) हे निजामशाहीच्या अधिपत्याखाली होते तेथे विजय राघव हा अधिकारी होता तो शहाजींचा व्याही होता शहाजीचा मोठा मुलगा संभाजी याचे लग्न विजय राघवच्या मुलीशी झाले होते.

शहाजीची पत्नी जिजाबाई ही गरोदर असल्याने तिला जुन्नर (पुणे) च्या शिवनेरी किल्ल्यात विजय राघव यांचे संरक्षणाखाली ठेवण्यात आले होते .

मध्यंतरी याच काळात मोगलांकडे सरदारकी स्वीकारलेले जिजाबाईचे वडील लखुजी जाधव यांनी मोगलशाहीची (दिल्ली ) नोकरी सोडून पुन्हा निजामशाहीत नोकरीवरती आले पण सप्टेंबर महिन्यात बुऱ्हान निजामशहाने मारेकरी घालून शहाजीचे सासरे लखोजी जाधव व त्यांच्या दोन मुलांना ठार केले .

इसवी सन १६३०

यावेळी शहाजी खानदेश जळगाव मध्ये होते इकडे जुन्नर शिवनेरी किल्ल्यावरती जिजाबाई प्रसूत होऊन तिला एक पुत्र झाला हेच ते शिवाजी महाराज जन्म दिनांक १९ फेब्रुवारी १६३०

सासरे लखोजी जाधवाचा खून झाल्यामुळे शहाजीला निजामशाहीत राहणे धोक्याचे वाटू लागले त्यांनी परत निजामशाही (अहमदनगर )सोडून मोगलशाही (दिल्ली) ची मनसबदारी म्हणजे नोकरी पत्करली

मध्यंतरी मलिक अंबरचा मुलगा फत्तेखान याची तुरुंगातून सुटका होऊन तो निजामशाहीचा कारभार पाहू लागला त्याने बुरहान निजाम शहास कैदेत टाकले बुरहान कैदेत मरण पावल्या नंतर हुसेनशाह यास गादीवर बसवून त्यांनी त्यास मोगलांच्या स्वाधीन केले व स्वतः मुघलाची नोकरी /सरदारकी पत्करली

या सर्व घडामोडी बघून शहाजीराजांनी परत मुगलपक्ष सोडून निजामशाहीच्या गादीवर एका अल्पवयीन मुलास सुलतान म्हणून बसवले, आजूबाजूचा प्रदेश ताब्यात घेतला व निजामशाहीचा कारभार पाहू लागले .

जून १६३३

मलिक अंबर चा मुलगा व मुघलांचा (दिल्ली )सरदार फत्तेखान याने मोघलाच्या मदतीने दौलताबाद वर आक्रमण केले व किल्ला ताब्यात घेतला.

ऑक्टोबर १६३५

यावेळी शहाजी हे ठाण्यात माहुरीच्या किल्ल्यात होते व निजामशाहीकडून लढत होते शत्रू पक्षाचे बळ लक्षात घेऊन शहाजीने किल्ला मोघलाचे स्वाधीन केला अशा प्रकारे अहमदनगरच्या निजामशाहीचा शेवट झाला .

सन १६३६

आदिलशहाने लागलीच शहाजीस आपल्या नोकरीत घेतले शहाजी आपल्या परिवारासह १६३६ च्या मे महिन्यात विजापुरात दाखल झाले या दरम्यान आदिलशाही (विजापूर /कर्नाटक )व कुतुबशाही( गोवळकोंडा /हैदराबाद )एकत्र आली व कर्नाटक ताब्यात घेण्याची योजना आखली पश्चिम कर्नाटक आदिलशहाने व पूर्व कर्नाटक कुतुबशहांनी घ्यावे असे ठरले विजापूरकरांनी म्हणजेच आदिलशहाने रणदुल्लाखान व शहाजीराजे यांची या स्वारीवर सरदार म्हणून नेमणूक केली.

सन १६३७ ते १६४० च्यादरम्यान रनादुल्लाखान व शहाजीराजे यांनी कर्नाटकावर एकंदरीत तीन स्वाऱ्या केल्या या मुसलमानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी सर्व हिंदू राजांनी एकत्र यावे असा जोरकस प्रयत्न विजयनगर साम्राज्याचे वारसदार व्यंकटपती व श्रीरंग राय (तिसरा) यांनी केले पण शेवटपर्यंत हिंदू राजे एकत्र आले नाही.

सन १६३७

पहिली स्वारी सन १६३७ एकेरीच्या वीरभद्र नायकाचा पराभव होऊन त्याने आदिलशहास अर्धे राज्य व अठरा लाख पॅगोडा दिले.

सन १६३८ मध्ये दुसरे स्वारी केली यात रणदुलाखान व शहाजी यांचे सोबत अफजलखानही होता. या स्वारीत कस्तुरीरंग राय शरण आले तरी अफजलखानाने विश्वासघाताने त्याला ठार केले.

याचवेळी शहाजीने केंपगौडाचा पराभव करून बेंगरूळ चा किल्ला ताब्यात घेतला रणदुलाखानाने शहाजीची बेंगरुळास नियुक्ती करून त्यास विजापूर आदिलशाहीची मान्यता मिळवून दिली. बेंगरूळातून शहाजीने

श्रीरंगपट्टमवार स्वारी केली आणि कंठीरस नरस याला शरण आणले.शहाजीने आदिलशाहीसाठी बेंगरूळ हे आपले मुख्य ठिकाण केले येथे शहाजी आदिलशहाच्या वतीने खुला दरबार भरवीत असे व राज्य कारभार करीत असेल

२५ जुलै १६४८ शहाजीचे वर्चस्व सहन न होऊन आदिलशहाने मुस्तफाखान व मुधोळच्या बाजी घोरपड्याच्या मदतीने शहाजीस जिंजी नजीक अटक केली व बिजापूरच्या दरबारात नेले .

या दरम्यान पुण्याच्या परिसरातील किल्ले शिवाजी महाराज काबित करीत होते सिंहगड हा किल्ला शिवाजींच्या ताब्यात होता म्हणून बापलेक आदिलशाविरुद्ध कारस्थान करीत आहेत असा महंमद आदिलशहाला संशय होता.

वडिलांना अटक झाल्याचे कळतात शहाजींचा थोरला मुलगा शिवाजी महाराजांचा सख्खा मोठा भाऊ संभाजी याने मंगरूळवरून आदिलशहा विरुद्ध उठाव केला तर शिवाजीने दक्षिणेत मुघलांतर्फे अधिकारावर असलेल्या शहाजहान बादशहाचा मुलगा मुरादतर्फे आदिलशहा मोहम्मद यांच्यावर दडपण आणले. मोघलांकडून आलेले दडपण व संभाजी आणि शिवाजी कडून झालेल्या उठावाचा परिणाम मोहम्मद आदिलशहावर झाला व

सन मे १६४९ एकंदर दहा महिन्याच्या बंदीवासानंतर शहाजीची मुक्तता झाली व त्यांची परत बेंगळुरास नेमणूक करण्यात आली.

सन १६५४ कनकगिरीच्या लढाईत शहाजींचा मोठा मुलगा व शिवाजींचा मोठा भाऊ संभाजी हा मारला गेला.

शहाजींला तुकाबाईपासून झालेला मुलगा एकोजी उर्फ व्यंकोजी हा या लढाईत शहाजीस मदत करीत होता .सन १६५६ सालीमोहम्मद आदिलशहा मरण पावला आणि औरंगजेबाने बिजापूर मुलखावरती स्वाऱ्या केल्या.सन १६६२ आदिलशहाने शिवाजींच्या बंडखोरीस आळा घालण्यासाठी शहाजीस मध्यस्थी करण्यास सांगितले शहाजीने शिवाजीची भेट घेतली शहाजीत आणि शिवाजी गुप्त चर्चा झाली काय ठरले ते बाहेर आले नाही.

सन १९६४ २३ जानेवारी १६६४ रोजी शहाजी शिकारीस गेले असता होदेगिरीच्या जंगलात त्यांच्या घोड्याचा पाय एका वृक्षवेलीमध्ये अडकला त्यामुळे ते घोड्यावरून जोरात खाली पडले व मरण पावले.

त्यांच्या मृत्यूनंतर एकोजी यांनी आदिलशाही आणि नंतर बिजापूरच्या सुलतानाकडून स्वतंत्र होऊन तंजावर येथे आपले स्वतंत्र मराठी राज्य स्थापन केले. एकोजी यांचा सन १६८६ मध्ये मृत्यू झाला त्यानंतर त्यांच्या वंशजानी तंजावरचे मराठी राज्य चालवले.

शहाजीराजे यांची कारकीर्द

१) सन १६११ निजामशाहीत मनसबदार

२) सन १६२५ इब्राहिम आदिलशाकडे सरलष्कर पद

३) सन १६२७ आगस्ट परत निजामशाहीत मनसबदार

४) सन १६२९ ऑक्टोबर मोगलशाही(दिल्ली) मनसबदार

५) सन १६३१ परत निजामशाहीत मनसबदार

६) सन १६३७ आदिलशाहीत मनसबदार

७) सन १६४८ आदिलशहाकडून अटक व

८) सन १६४९ मध्ये सुटका

९) सन १६४९ मे १६ ला परत आदिलशहाकडे रुजू

१०) सन १६६४ मध्ये घोड्यावरून पडून मृत्यू

शहाजीराजांची कारकीर्द ही १६०० ते १६६४ पर्यंत आहे आणि शिवाजी महाराजांची कारकीर्द ही १६३० ते १६८० पर्यंत आहे.

दोन्ही महान योद्धांची कारकीर्द व युद्धांचा उद्देश लक्षात घेतला तर दोघांचाही संघर्ष हा राज्यसत्तेसाठी असून मुसलमानांविरुद्ध किंवा इस्लाम विरुद्ध नव्हता हे स्पष्ट होते. आज इथले राज्यकर्ते शिवाजींना मुसलमान विरोधी ठरवत आहेत हे पूर्णतः चूक आणि समाजाची दिशाभूल करणारे कार्य आहे म्हणून बहुजन समाजाने खरा इतिहास वाचावा , राज्यकर्त्यांच्या स्वार्थाला बळी पडू नये.

**प्रमोद मून**
९४२३०६३१२७

# तिरोडा,गोरेगाव,सडक अर्जुनी व आमगाव नक्षलग्रस्त तालुके जाहीर करा

## जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर व तिरोड्याचे आमदार विजय रहांगडाले यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**गोंदिया/तिरोडा:**–महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाच्यावतीने काढण्यात आलेल्या शास निर्णयानुसार गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव,देवरी,सालेकसा व गोंदिया तालुक्यांना नक्षलग्रस्त क्षेत्र ठरवित शासनाच्या नक्षलग्रस्त धोरणानुसारच्या सर्व योजना लागू करण्यात आल्या आहेत.त्यातच जिल्ह्यातील तिरोडा,गोरेगाव, सडक अर्जुनी आणि आमगाव तालुक्यांना वगळल्याने या ४ तालुक्यांमधील कर्मचाऱ्यांवर अन्याय झालेला असून शासनाच्या नक्षलग्रस्त धोरणानुसार मिळणार्या आर्थिक लाभापासून वंचित राहावे लागणार आहे.त्यातच जिल्ह्यातील नक्षल घटनांचा आढावा घेत जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात नक्षल हालचाली होत असल्याने वगळलेल्या तालुक्यांचाही नक्षलग्रस्त भागात समावेश



करण्यात यावे या मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर व तिरोडा गोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिले आहे.

या भागांना नक्षलग्रस्त क्षेत्रात समाविष्ट करावे जेणेकरून पोलिस,शिक्षण किंवा इतर विभाग असो, कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेल्या अनेक सुविधा यापुढेही उपलब्ध राहतील आणि कर्मचाऱ्यांचे मनोबल उंच राहील.त्यांना सुरक्षा कवचात ठेवण्यात येईल.या चारही तहसीलमधील कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

आमदारांनी त्यांच्या पत्रात म्हटले आहे की गोंदिया जिल्हा महाराष्ट्र राज्य आणि मध्य प्रदेश प्रांताच्या जवळ आहे.जिथे नेहमीच नक्षलवादी कारवायांच्या बातम्या येत असतात.त्यामुळे उर्वरित तहसील नक्षलग्रस्त घोषित करण्यात यावे.

# नवेगाववबांध येथे फ्युचरिस्टिक क्लासरूम लॅबचे उद्घाटन

**नवेगावबांध :–** ग्रामीण विद्यार्थ्यांनाही जागतिक स्तराचे तांत्रिक शिक्षण मिळावे, यासाठी अशा प्रयोगशाळा अत्यंत आवश्यक आहेत. ही लॅब विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि स्पर्धेची तयारी घडवते. या लॅबचा प्रभावी वापर होण्यासाठी शिक्षकांना ३ ते १० दिवसांचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. फ्यूचरिस्टिक क्लासरूम लॅबमुळे शिक्षणात तांत्रिक क्रांती घडेल, असे प्रतिपादन जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.




स्थानिक जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय येथे फ्युचरिस्टिक क्लासरूम लॅबचे उद्घाटन सोमवारी (दि.२१) जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे जिल्हा परिषद सदस्या व शाळा समिती अध्यक्षा रचना गहाणे, प्रमुख पाहुणे होमराज पुस्तोडे, विजय डोये, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष हरिश्चंद्र चांदेवार, नितीन पुगलिया, लोकमत प्रतिनिधी रामदास बोरकर, काशिवार, जागेश्वर मते, दयाराम लंजे, शीतल राऊत, भीमाबाई शहारे, नाजूक लंजे, श्यामराव कोल्हे, शारदा नाकाडे उपस्थित होते. मुंबईतील खासगी संस्था व शासन यांच्या संयुक्त सहकाऱ्याने हे प्रशिक्षण राबविले जाते.

ही लॅब अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत उभारण्यात आली असून, जिल्ह्यातील आठही फ्यूचरिस्टिक लॅबसाठी संगणकतज्ज्ञ नेमण्यात येणार असल्याची माहिती जि.प.उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी दिली. या लॅबचा प्रभावी वापर होण्यासाठी शिक्षकांना ३ ते १० दिवसांचे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुंबईतील खासगी संस्था व शासन यांच्या संयुक्त सहकार्याने हे प्रशिक्षण राबवले जाते. ही लॅब अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत उभारण्यात आली असून, जिल्ह्यातील आठही फ्युचरिस्टिक लॅबसाठी संगणकतज्ज्ञ नेमण्यात येणार असल्याची माहिती उपस्थित मान्यवरांनी दिली.

# शहरातील मुख्य चौकांवर हायटेक सीसीटीव्ही कॅमेरे लावा



**गोंदिया :–** शहरातील वाढती गुन्हेगारी,तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याने घडत असलेले अपघात बघता शहरातील मुख्य चौकांवर हायटेक सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत, यासह अन्य विषयांना घेऊन सिंधी जनरल पंचायतच्या प्रतिनिधी मंडळाने वाहतूक नियंत्रण शाखेचे निरीक्षक नागेश भास्कर यांची भेट घेऊन चर्चा केली.

या चर्चेला सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष दरियानोमल आसवानी, महेश आहुजा, अशोक जयसिंघानी, विनोद चांदवानी आदी उपस्थित होते. चर्चेत शहरात सध्या मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी घटना घडत आहेत. घरफोड्यांचे प्रमाण वाढले असून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्यामुळे अपघात घडत आहेत. विशेष म्हणजे, शहरातील प्रत्येकच भागात मोठ्या प्रमाणात गतिरोधक तयार करण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या घरासमोर आपल्या मर्जीने गतिरोधक तयार करून घेतले असून गतिरोधकांमुळे मोठ्या प्रमाणात अपघात घडत आहेत. शिवाय, मोकाट जनावरांचे बस्तान रस्त्यांवरच राहत असून यामुळे वाहतूक विस्कळीत होत असून अपघातांच्या घटना घडत आहेत. अशात, शहरातील मुख्य चौकांवर हायटेक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे. रस्त्यांवर असलेल्या ब्रेकरमुळे होणारी गैरसोय टाळण्यात यावी व शहरातील भटक्या जनावरांमुळे होणाऱ्या अपघातांची समस्या लक्षात घेत या समस्येवर तोडगा काढण्यात यावा अशी मागणी प्रतिनिधी मंडळाने केली.

यावर पोलिस निरीक्षक भास्कर यांनी अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सर्व मुद्दे बारकाईने ऐकून घेतले व लवकरच टप्प्याटप्प्याने उपाययोजना करून समस्यांवर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. शहरात सुरक्षित, शिस्तबद्ध व आधुनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याचा विश्वास व्यक्त केला.

## तिरोडा–खैरलांजी मार्गावरील पथदिवे बंद

**तिरोडा:–** शहरातील खैरलांजी मार्गावरील संपूर्ण पथदिवे काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे गत ३–४ दिवसांत २ अपघात झाले. त्यात एकाचा मृत्यू तर दुसऱ्या अपघातात डोक्याला जबर मार लागल्याने गंभीर जखमी होऊन कोमात गेल्याची माहिती आहे.

तिरोडा ते खैरलांजी मार्ग हा मध्य प्रदेशला जोडणारा मार्ग असल्यामुळे वाहनांची वदर्ळ राहते. अशातच रात्रीच्या सुमारास टिप्पर आणि जडवाहनांचे, रेतीच्या टिप्परचे आवागमन मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या रस्त्यावर पथदिवे सुरू असणे गरजचे आहे. काही दिवसांपूर्वी डॉ.आंबेडकर रेल्वे चौकीच्या नवनिर्मित पुलावरून आवागमन सुरू करण्यात आले. ज्या कंपनीला काम दिले होते, त्यांनी पथदिवे लावले मात्र ते बंद आहे. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांच्या प्रकाशामुळे विरुद्ध दिशेने येणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यांसमोर काळोख पसरून अपघात होत आहे. त्यामुळे पुलावरील पथदिवे तातडीने सुरू करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे

# वाहतूक सिग्नलमधील आकडे मराठी भाषेतून प्रसारीत करा-मनसे




**गोंदिया:–** शहरातील विविध चौकात वाहतुक सुरळीत करण्याकरीता लावण्यात आलेल्या वाहतूक सिग्नलमधील आकडे इंग्रजीत न दाखविता मराठीमध्ये दाखविण्याच्या मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकारी श्रीकांत कांबळे यांना देण्यात आले.

यावेळी मनसेच्यावतीने शहरात ठिकठिकाणी लागलेल्या वाहतूक सिग्नलवर इंग्रजी भाषेत आकडेवारी प्रसारीत केले जात आहे.शहरात येणारे नागरिक हे ग्रामीण भागातील असून त्यांना इंग्रजी आकड्यामुळे गोंधळल्यासारखे होत असल्याने त्यातील तंत्रज्ञात बदल करुन मराठी भाषेचा सहभाग करण्यात यावे असे मनसेच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी यांच्याशी चर्चा करतांना सांगितले.मराठी भाषेत आकडेवारी व शब्दांचा समावेश करण्यात यावे जेणेकरून मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात होईल.

मराठी भाषेचा प्रचार प्रसार होईल व अभिमान वाटेल असे या निवेदनाच्या माध्यमातून म्हटले आहे. निवेदन सादर करतांना मनसेचे शहर अध्यक्ष सुरेश (नानु) चौधरी, माजी शहर संघठक क्षितिज वैद्य, शहर उपाध्यक्ष सुमित कावळे, शहर उपाध्यक्ष रजत बागडे, शहर उपाध्यक्ष डिलेश उईके, शहर सचिव माधव बनकर, शाखा अध्यक्ष कार्तिक राऊत तसेच सर्व महाराष्ट्र सैनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

## अवैध बांधकामांवर मनपाची नजर

**चंद्रपूर–**महानगरपालिकेतर्फे अवैध बांधकामांना आळा घालण्यासाठी झोन निहाय टीम नियुक्त करण्यात आली असुन प्रत्येक वॉर्डमध्ये सुरु असलेल्या अथवा सुरु होणाऱ्या सर्व अवैध बांधकाम तपासणी सदर टीमद्वारे केली जाणार आहे. चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात परवानगीविना वाढणाऱ्या अवैध बांधकामांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने झोन निहाय स्वतंत्र तपासणी पथकांची स्थापना केली आहे. ही पथके त्यांच्या झोनमधील प्रत्येक वॉर्डमध्ये नियमितपणे दौरे करत असून सुरु असलेल्या किंवा नव्याने सुरु होणाऱ्या बांधकामांची तपासणी करीत आहेत.अतिक्रमण वा अवैध बांधकाम स्वतः हुन न हटविल्यास मनपातर्फे कारवाई केली जाते.

# गोंदिया जिल्हा मच्छिमार संघाच्या अध्यक्षपदी मुकेश शिवहरे



**गोंदिया:–** जिल्हा मच्छीमार संघाच्या २२ जून रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत १२ पैकी ११ संचालक शिवसेना शिंदे गटाचे नेता मुकेश शिवहरे यांच्या नेतृत्वात विजयी झाले होते. १९ जुर्ले रोजी झालेल्या जिल्हा मच्छिमार संघाच्या अध्यक्ष पदाच्या निवडणूकीत मुकेश शिवहरे व उपाध्यक्ष पदावर लक्ष्मीचंद मेश्राम यांची बिनविरोध निवड करण्यात आली.निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक पी.एच.सोनारकर यांनी काम पाहिले.

अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणूकीत मच्छिमार संस्थेचे संचालकामध्ये राजहंस ढोके, विनोद दानवे, बालचंद बाड़बराई, अभिमन मांडारकर, रोहित पटले, सुरेंद्र महापात्र, कल्पनाबाई नागपुरे, निर्मलाबाई बंसोड़, ताराचंद भोगारे, शिवलाल उके सहभागी झाले होते.

यावेळी टोकेश हरिणखेडे, राजकुमार तिवारी, संजय बिसेन, आकाश खोबरागड़े, भरत भाऊ मेश्राम, जयेंद्र मानकर, महागु मेश्राम, कोदू टेकाम, रविन्द्र मेश्राम, रफीक शेख, गज्जू धुदबर्वे, घनशराम मेश्राम, किशोर तुमसरे, हरि भाऊ मांडारकर, भीमराव उके, राजेश दानवे, वासुदेव बांगड़कर, उपेंद्र (बापी) लांजेवार, सुनील सेंगर, मनीष गौतम, गोलू डोहरे, गुड्डू उके, सुशील मानकर, संदीप बासडकर, श्रीश तांडेकर, सीनू सनपला, धनुष लिल्हारे, दिल्लू गुप्ता, पिंटू बावनकर आदीनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्षांचे अभिनंदन केले.

## प्रहार संघटनेच्या वतीने २४ जुर्लेला राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन

**तिरोडा::**–राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करून त्यांचा सातबारा कोरा करावा. तसेच दिव्यांग आणि विधवांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत या मागणीसाठी येत्या दि. २४ जुलै रोजी राज्यभर दोन तास चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे, अशी घोषणा करत माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे.शेतकरी भुमीहिन मजूर, दिव्यांग बांधव, निराधार, विधवा महिला शोषित पिडीत कुटुंबातील आपल्या हक्काच्या मागण्या करीता चक्काजाम आंदोलनाला नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन गोंदिया जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर यांनी केले.

# नवोदयच्या प्रवेशापासून ओबीसी विद्यार्थी राहणार वंचित

**गोंदिया:–** जिल्ह्यातील नवेगावबांध येथील जवाहर नवोदय विद्यालयात शैक्षणिक सत्र २०२५–२६ करिता इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सध्या सुरू आहे. परंतु, यावर्षी प्रवेश अर्ज भरतेवेळी ओबीसी विद्यार्थ्यांना केंद्र सरकारचे जाती प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आल्यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून ही अट शिथिल करावी, प्रवेश झाल्यानंतर काही दिवसांची मुदत द्यावी, अशी मागणी केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडील जात प्रमाणपत्र ग्राह्य न धरता, केंद्र सरकारचे जात प्रमाणपत्रच ग्राह्य धरले जात आहे. ही अट अगदी अचानक लादण्यात आल्याने अनेक विद्यार्थी व पालकांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. कारण ग्रामीण व आदिवासी भागात केंद्राची जात प्रमाणपत्र मिळिवण्याची प्रक्रिया वेळखाऊ आणि जटील आहे.

अनेक ठिकाणी महसुल विभागाकडून विलंब होत असून, २९ जुलै या अंतिम मुदतीपूर्वी प्रमाणपत्र मिळणे अशक्य आहे. त्यामुळे आपली मुले नवोदय परीक्षेपासून वंचित राहणार नाही ना? अशी भीती इतर मागास वर्गातील पालकांना वाटत आहे. याबाबत नवोदय विद्यालय समितीने पुनर्विचार करावा व ओबीसी विद्यार्थ्यांना याबाबतीत दिलासा द्यावा, अशी मागणी ओबीसी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेश झालेले विद्यार्थी विद्यालयाने दिलेल्या मुदतीत केंद्र सरकारचे जाती प्रमाणपत्र सादर करतील, अशी सवलत देण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

विशेष म्हणजे अनुसूचित जमाती (एसटी), अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी राज्य सरकारकडील जात प्रमाणपत्रही ग्राह्य धरले जात आहे. हीच सवलत ओबीसी विद्यार्थ्यांना दिली जात नाही, ही बाब असमानता निर्माण करणारी आहे, असे ओबीसी पालकांचे म्हणणे आहे.

सध्या खरीप शेतीचा हंगाम सुरू आहे, शेतीच्या कामात पालक व्यस्त आहेत. दाखले व इतर कागदपत्र गोळा करून, सेतू करून २९ जुलैपर्यंत केंद्राचे जात प्रमाणपत्र मिळिवणे अशक्य आहे.त्यामुळे सध्या उपलब्ध असलेले राज्य शासनाचे जात प्रमाणपत्र ग्राह्य धरावेत किंवा परीक्षा होईपर्यंतची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

## 'मत्स्यकन्या' संस्थेतील महिलांचे आंदोलन

**गोरेगाव:–** मत्स्यपालन करण्यासाठी संस्था पात्र असतानाही तिला वगळून दुसऱ्या संस्थेला कंत्राट देण्यात आला. याची तक्रार मत्स्यकन्या मच्छीमार संस्थेच्यावतीने करण्यात आली. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे सोमवारी (दि. २१) महिलांनी प्रकल्पाच्या काठावर आंदोलन सुरू केले. या आंदोलनामुळे प्रशासनाची धावपळ उडाली. न्याय न मिळाल्यास जलसमाधी घेणार असल्याचा इशाराही सदर महिलांनी दिला.

गोरेगाव तालुक्यातील चोपा येथील मत्स्यकन्या महिला मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्यादित या संस्थेने आता थेट जलसमाधीचा निर्धार करीत प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात निर्णायक लढाई सुरू केली आहे. संस्थेच्या अध्यक्ष कमला मौजे, सचिव अनिता नागपुरे आदी सदस्यांनी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षकांकडे वेळोवेळी तक्रार दाखल करूनही कोणतीच ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे महिलांमध्ये प्रचंड रोष आहे. मत्स्यपालन संस्थांना तलाव वाटप सरकारचे आश्वासन आता आमच्यासाठी केवळ थट्टा ठरत आहे. आम्ही आता माघार घेणार नाही.

हा आमचा शेवटचा इशारा आहे.प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असून संस्थेवर अन्याय करून दुसऱ्या संस्थेला प्राधान्य देण्यात आले. सहाय्यक निबंधकांची भूमिका अस्पष्ट असून अनेकदा तक्रार करूनदेखील दुर्लक्ष केल्याचा आरोप महिलांनी केला.

## वेतन फरकातील त्रुटीसंदर्भात कर्मचारी महासंघाचे आ.फुकेंना निवेदन



**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्यावतीने जिल्ह्यातील वगळलेल्या ४ तालुक्यांना पुन्हा नक्षलग्रस्त यादीत समावेश करण्यासह लिपिकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याच्या मागणीचे निवेदन आमदार परिणय फुके यांना १९ जुर्ले रोजी देण्यात आले. यावेळी आमदार फुके यांनी वेतनश्रेणीत असलेल्या त्रुटीबद्दल सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन कर्मचारी महासंघाच्या शिष्टमंडळाला दिले.निवेदनात गोंदिया जिल्हा परिषद कर्मचाऱ्याचे माहे जुलै २५ पासून ४ तालुक्यातील कर्मचाऱ्यांचे वेतन कमी होत असल्याचे निर्देशनास आणून दिले.वेतन त्रुटी समितीच्या चुकीच्या निर्णयानुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्यावर अन्याय होत असून जिल्हा परिषद कर्मचाऱ्याचे वेतन अन्य मंत्रालयीन कर्मचाऱ्यापेक्षा कमी असल्याचे सुद्धा निदर्शनास आणून दिले. यावेळी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष सौरभ अग्रवाल, जिल्हा सरचिटणीस संतोष तोमर, नंदलाल कावळे, किशोर येले, यश गडपल्लीवार उपस्थित होते.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,गोंदिया
## निविदा सुचना क्र. ०५ सन २०२५-२६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग गोंदिया मार्फत खालील दर्शविलेल्या कामाच्या(संबधित कार्यालयाकरीता वाहन पुरवठा करणे) निविदा मागविण्यांत येत आहे.

सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक.२५.०७.२०२५ ते दिनांक ०८.०८.२०२५ पर्यंत विभागीय कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

१) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग गोंदिया करीता Commercial Taxi permit वाहन पुरवठा करणे ई. कामे – किंमत रु.६,९७,५००/–

२) उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग क्र.१, गोंदिया करीता Commercial Taxi permit वाहन पुरवठा करणे ई. कामे किंमत रु.५,५८,०००/–

३) उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग क्र.२, गोंदिया करीता Commercial Taxi permit वाहन पुरवठा करणे ई. कामे किंमत रु.५,५८,०००/–

४) उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,उपविभाग क्र.३, गोंदिया करीता Commercial Taxi permit वाहन पुरवठा करणे ई. कामे किंमत रु.५,५८,०००/–

५) उपअभियंता (यां),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग गोंदिया करीता Commercial Taxi permit वाहन पुरवठा करणे ई. कामे किंमत रु. ५,५८,०००/–

कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
गोंदिया

जिमाका/गो/जाहिरात/२०२५–२६/२९


# राज्य आदिवासी आरोग्य समितीची कावराबांध व केशोरी आरोग्य केंद्राला भेट



**गोंदिया:–** महाराष्ट्र राज्य आदिवासी आरोग्य समितीच्या अध्यक्षा आणि नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी (भाप्रसे) यांचा गोंदिया जिल्ह्याला दि.१९ ते २० जुलै दोन दिवसीय दौर्याला सुरुवात झाली.यावेळी त्यांच्या सोबत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी श्री.खुश (भाप्रसे) श्री.साई किरण (भाप्रसे) आणि राज्य कार्यक्रम व्यवस्थापक महीला व बालकल्याण दिग्विजय शिंदे यांचा समावेश होता.

दौऱ्याची सुरुवात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि केटीएस सामान्य रुग्णालय येथील भेटीने झाली. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.पुरुषोत्तम पटले व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांचेशी भेटुन आदीवासी व नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील गावात आरोग्य सेवा देताना अडीअडचणी तसेच आदिवासी आरोग्याशी संबंधित मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी आरोग्य सेवेत सुधारणा करण्यासाठी आपल्या शिफारसी दिल्या.

यानंतर पथकाने आदिवासी व नक्षलग्रस्त सालेकसा तालुक्याची भेट घेतली. प्राथमिक आरोग्य केंद्र कावराबांध येथे बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांसह संवाद साधून आदिवासी आरोग्य समस्यांवर विस्तृत चर्चा झाली. त्याचबरोबर कावराबांध व मुंडीपार येथील आदिवासी वाड्यांमध्ये गरोदर माता व बाळंतिणींच्या घरी भेटी देऊन त्यांना देण्यात येत असलेली आरोग्य सेवा प्रत्यक्ष पाहण्यात आली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरजंन अग्रवाल, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण, बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किर्तीकुमार कटरे, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाचे डॉ.पवन राऊत, सालेकसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील आत्राम, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित कोडनकर उपस्थित होते.



अर्जुनी मोरगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र केशोरी येथे राज्य आदिवासी आरोग्य समितीच्या सदस्यांनी (दि.२०) रोजी भेट देत आरोग्य केंद्रातील सोयी सुविधा व आदिवासी समाजाला मिळणार्या योजनाचा आढावा घेतला.या समितीच्या अध्यक्षपदी नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ मिताली सेठी या आहेत. यावेळी आदिवासी भागातील आरोग्य विषयक समस्या जाणून घेण्यात आल्या व त्यावर करण्यात येणाऱ्या उपायोजना यांचा आढावा घेण्यात आला. विविध आरोग्य सेवा, सुविधांची तपासणी केली गेली आणि स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून जिल्हाधिकारी व समिती अध्यक्ष डॉ मिताली सेठी यांनी समजून घेतल्या.

याप्रसंगी गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी समिती अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांना जनआरोग्य समितीला मिळणाऱ्या निधीत दुप्पट वाढ करण्यात यावी, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक मनुष्यबळ तातडीने पुरवावे, औषधांचा साठा नेहमी भरपूर प्रमाणात उपलब्ध असावा, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गाड्यांसाठी दोन ड्रायव्हर नेमावेत, जिर्ण झालेल्या इमारतींचे नूतनीकरण करण्यात यावे, प्राथमिक आरोग्य केंद्रांना नवीन इमारतींची उभारणी करण्यात यावी अशी मागणी केली.

महिला व बालकल्याण सभापती पोर्णिमा ढेंगे, जिल्हा परिषद सदस्य जयश्री देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले, जिल्हा साथरोग अधिकारी अग्रवाल, माजी जिल्हा परिषद सदस्य तेजुकला गहाणे, सरपंच नंदकुमार गहाणे, तालुका वैद्यकीय अधिकारी सुकन्या कांबळे, श्रीराम शेंडे, प्रकाश वलथरे, विलास बोरकर, डॉ पिंकू मंडल, डॉ. मस्के तसेच इतर मान्यवर आणि आरोग्य कर्मचारी व महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते.

# आ.फुकेंच्या ताफ्यातील पोलीस वाहनाच्या धडकेत युवकाचा मृत्यू






**गोंदिया:–** राज्याचे माजी मंत्री तथा विधान परिषद सदस्य परिणय फुके यांच्या ताफ्यातील पोलीस वाहनाने (चक ३५,अठ–२१५९)विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीस जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.ही दुर्घटना गोंदिया–गोरगाव मार्गावरील हिरडामाली परिसरात घडली.अपघातानंतर आमदार फुके हे घटनास्थळी न थांबल्याने कुटुंबियामध्ये त्यांच्याबद्दल रोष उफाळून आल्याचे दिसून आले.

विशेष म्हणजे ज्या पोलीस वाहनाने अपघात झालेला आहे,त्या वाहनाचा विमा हा ऑनलाईन तपासल्यावर विमा अपडेट नसल्याचे दिसून आले.तर पोलीस विभागातील कांहीनुसार गृपविमा आहे.परंतु उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकार्यांशी सपर्क केल्यावर गृप असो की व्यक्तीगत विमा असल्यास ऑनलाईनला दिसायलाच हवे असे त्यांचे म्हणने आहे.

मृतकाचे नाव अरविंद पन्नालाल चव्हाण (वय ३०, रा. महाजनटोली गोरेगाव) असे असून, तो गोंदियाकडून गोरगावच्या दिशेने दुचाकीने जात होता. याच दरम्यान गोंदियाच्या दिशेने जात असलेल्या परिणय फुके यांच्या ताफ्यातील पोलीस वाहनाने (चक ३५,अठ–२१५९)समोरून आलेल्या दुचाकीला जोरदार धडक दिली.धडकेनंतर अरविंद चव्हाण गंभीर जखमी झाल्याने जखमीला गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी हल–वले.मात्र,वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास गोरे–गाव पोलीस स्टेशन करत असून, अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### आमदारांच्या संवेदनशून्यतेची चर्चा

**अमूक खासदार, आमदार, मंत्र्याने ताफा थांबवून अपघातग्रस्ताला मदत केली, स्वतःच्या वाहनात रुग्णालयात नेले. अशा बातम्या आपण वाचतो. मात्र आज घडलेल्या घटनेत आ. फुकेंनी घटनास्थळी गाडीतून न उतरता घटना घडल्यानंतर क्षणभर थांबून घटनास्थळावरून काढता पाय घेतल्याने व जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यांच्या येण्याची वाट बघणार्यांना त्यांची ही संवेदनशून्यता मात्र चर्चेचा विषय ठरली.**





**तोपर्यंत उत्तरीय तपासणी नाही–कुटुंबियाची भूमिका**

हिरडामाली पेट्रोलपंपासमोर आज घडलेल्या पोलीस वाहना–तील अपघातात आपला मुलगा गमावलेल्या आई देवागंण चव्हाण व मृतकाची पत्नी भाग्यश्री अरविंद चव्हाण यांनी ज्या आमदारांच्या ताफ्यातील वाहनाने आमचा आ–सरा हिरावून घेतला.त्या ताफ्यातील आमदार परिणय फुके यांना आमच्या दुःखाचे काहीच कसे कळत नाही.ते जोपर्यंत जिल्हा रुग्णालयात येत नाही,तोपर्यंत उत्तरीय तपासणी करु देणार नाही.आम्हाला त्यांच्याकडून काही आर्थिक मदत नको,परंतु संवेदना तरी येऊन व्यक्त करायला काय जाते असे म्हणाल्या.

**आ.अग्रवालांनी काढली समजूत**

आमदार विनोद अग्रवाल यांनी मृतकाच्या कुटुबियांची समजूत काढत योग्य ती मदत करण्याचे आश्वासन देत आपल्याकडून २ लाख रुपयाची मदत व ६ लाख रुपये विम्याची रक्कम अशी मिळवून देण्याची ग्वाही दिल्यानंतर आंदोलन मागे घेत मृतकाची उत्त्रीय तप–ासणी करण्यात आली.त्यानंतर मृतदेह कुटिबियांना सोपवण्यात आले. मात्र विधानपरिषदेचे आमदार परिणय फुके गोंदियात असूनही पोचले नाही. गोंदिया पंचायत समितीचे व बाजार समितीचे सभापती मुनेश रहागंडाले,गोंदिया बाजार समितीचे उपसभापती राजकुमार पटले ,माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे, माजी सभापती मनोज बोपचे, विश्वजित डोंगरे,गुड्डू कटरे,केव्हलराम बघेले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक अशोक गुप्ता,गंगाधर परशुरामकर,दुबे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात मृतकांच्या कुटुबियांनी सुरु केलेल्या आंदोलनास्थळी जात भेट घेत त्यांच्या भावना समजून घेतल्या.

# गोंदिया जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा राजेंद्र जैन





**गोंदिया:–** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव या पदांसाठीच्या १९ जुर्लेला पार पडलेल्या निवडणुकीत सहकार महायुती पॅनलने मोठा विजय मिळवला आहे. या निवडणुकीत पुनःश्व अध्यक्षपदी राजेंद्र जैन यांची निवड बहुमताने करण्यात आली.तर उपाध्यक्ष पदाकरीता भेरसिंग नागपुरे व सचिवपदी अजय हलमारे यांची निवड करण्यात आली.महाविकास आघाडीकडून अध्यक्ष येजेंद्र कटरे, उपाध्यक्ष अशोक गुप्ता व सचिव गंगाधर परशुराकर पदाकरीता यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले हो–ते.२० संचालक असलेल्या बँकेत महायुतीने ११ जागा जिंकल्या होत्या.तर महाविकास आघाडीने ९ जागा जिंकल्या होत्या.महाविकास आघाडीकडून विजयी झालेले पंकज यादव,अजय हलमारे व दुर्गाप्रसाद ठाकरे यांनी महायुती आघाडीला समर्थन दिल्याने महायुतीची संख्या १४ झाली.तर महाविकास आघाडीकडे काँग्रसचे ६ संचालकच राहिले.

बँकेच्या भविष्यकालीन कार्यासाठी अत्यंत सकारात्मक व सहकार क्षेत्रातील विकासाच्या दृष्टीने, शेतकरी व कष्टकरी यांच्या हितासाठी सदैव काम करू तसेच नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे सहकार क्षेत्रात अनुभव बँकेच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरणार आहे. यावेळी खासदार प्रफुल पटेल,आमदार परिणय फुके,आमदार विन–ोद अग्रवाल,आमदार विजय रहांगडाले, आमदार राजकुमार बडोले यांच्या सह सर्व बँक संचालकांचे, सहकार क्षेत्रातील सर्व मतदार बंधूचे व महायुतीतील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ता यांचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र जैन यांनी आभार मानले.नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव व सर्व संचालकांचे महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ता यांनी अभिनंदन केले.

जिल्हा बँकेच्या २० संचालकपदासाठी २९ जून रोजी निवडणूक पार पडली. ही निवडणूक प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व भाजपाने एकत्र येत सहकार पॅनल तयार करुन लढविली. निवडणुकीनंतर दोन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी अध्यक्षपदी राजेंद्र जैन हेच विराजमान होणार असे स्पष्ट केले. यानंतर जिल्हा बँकेतील ताकद आणखी वाढविण्यासाठी परिवर्तन पॅनलचे तीन सदस्य फोडण्याची सहकार पॅनलची खेळी यशस्वी झाली.

# निविदा प्रक्रियेत अडकले पांगोलीच्या जीर्ण पुलाचे बांधकाम

**गोंदिया :–** शहरालगत असलेल्या छोटा गोंदिया–चुलोद मार्गावरील पांगोली नदीवरील पूल अरुंद असून तो जीर्ण झाला आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम मंजूर करण्यात आले. त्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पण गेल्या वर्षभरापासून याची अद्यापही निविदा प्रक्रिया न झाल्याने या जीर्ण पुलाचे बांधकाम रखडले आहे.

या पुलावरून शाळकरी विद्यार्थी, दुचाकी, चारचाकी, मोठी मालवाहू वाहने, शालेय बसेस आदींची नियमित वाहतूक असते. तसेच नागरी वाहतूक असते. गोंदिया, चुलोद, दत्त–ोरा, आसोली, नवरगाव खुर्द, नवरगावकला, मोरवाही, इर्री या गावातील नागरिकांसाठी हा पूल महत्त्वपूर्ण आहे. याच पुलावरून त्यांची नियमित ये–जा असते. पांगोली नदीवरील पुलाचे बांधकाम जवळपास ३० ते ४० वर्षापूर्वी करण्यात आले होते. त्यामुळे हा पूल आता पूर्णपणे जीर्ण झाला आहे. तसेच पूल अरुंद असल्याने आणि पुलाच्या दोन्ही बाजूला लावलेले लोखंडी कठडेसुद्धा आता गायब झाले आहेत.



### पुलावर होते वाहतूककोंडी

**गोंदिया–चुलोद मार्गावरील पांगोली नदीवरील जुना पूल फारच अरुंद असून या पुलावरून एखादा ट्रक जात असल्यास बाजूने दुसरे वाहन जाऊ शकत नाही. परिणामी या पुलावर वाहतुकीची कोंडी होत असते.**

**पांगोली नदीवरील जीर्ण झालेल्या पुलामुळे जीव धोक्यात घालून या पुलावरून वाहतूक सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याची दखल घेऊन लवकरात लवकर पुलाचे बांधकाम सुरू करावे.**
**– डिंपल तीर्थराज उके, सामाजिक कार्यकर्त्यां**

पावसाळ्यात थोडाही जोराचा पाऊस झाला की हा पूल वाहतुकीसाठी बंद होतो. परिणामी या दहा गावांचा गोंदिया शहराशी संपर्क तुटतो. परिणामी बरेचदा विद्यार्थ्यांचेसुद्धा शैक्षणिक नुकसान होते. या परिसरातील दहा गार्वासाठी हा पूल जीवनदायिनी आहे. त्यामुळेच या पुलाचे बांधकाम करण्याची मागणी केली जात होती. यानंतर शासनाने वर्षभरापूर्वी या पुलाच्या बांधकामासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. तसेच या पुलाची रुंदीदेखील वाढविण्यात येणार होती.

पुलाचे काम अद्याप सुरू न झाल्यामुळे स्थानिक नागरिक व जनप्रतिनिधींत रोषाची भावना निर्माण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तसेच शासनाने या बाबीकडे लक्ष द्यावे, असेही उके यांनी आवाहन केले आहे.

# मुरूम उत्खनन करणाऱ्या जेसीबीचा सिनेस्टाईल पाठलाग आरोपी फरार; चालक,मालकावर गुन्हा दाखल

**गोंदिया:–** अवैधरित्या सुरू असलेले मुरूम उत्खनन करणा?या जेसीबीचा सिनेस्टाईल १५ ते २० किमी पाठलाग करून जेसीबी ताब्यात घेतली, मात्र आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. जेसीबीचालक दिनेश महारवाडे रा. इर्री तर जेसीबीम ालक कृष्णा फुंडे रा. खातिया ता. गोंदिया असे फरार आरोपींचे नाव असल्याची माहिती आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक केली जात आहे. या प्रकारावर आळा घालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असताना व कारवाया होत असतानाही खनिज माफिया कारवायांना न जुमानता राजरोषपणे गौणखनिजाचे उत्खनन व वाह–तूक करीत आहेत. १७ जुलै रोजी रात्री गोंदियाचे वनपरिक्षेत्राधिकारी दिलीप कौशिक हे त्यांच्या सहकाऱ्यांसह गस्त घालत असताना पहाटे २.३० वाजताच्या दरम्यान तालुक्यातील भदूटोला जंगल परिसरातील वनविभागाच्या राखीव वन गट क्र. ९२५ मध्ये जेसीबीने झाडेझुडपे तोडून मुरूम ाचे खोदकाम करीत असल्याचे वन पथकाच्या निर्दशनास आले. यावेळी जेसीबीचालक व उपस्थित अन्य एकाला उत्खननासंदर्भात वन अधिकाऱ्यांनी विचारणा केली. मात्र त्यांनी मुजोरी करीत उडवाउडवीचे उत्तर दिले.




### गोंदिया आरएफओंची धडक कारवाई

**गौणखनिज माफियांच्या डंडूकेशाहिला भीक घालणार नाही, अवैध उत्खननावर अंकूश घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. यापूर्वीही गौणखनिज माफियांवर कारवाई केली आहे व अशा कारवाया सुरूच राहणार.**
**– दिलीप कौशिक,वनपरिक्षेत्राधिकारी (प्रा.) गोंदिया**

जेसीबीजवळ जाऊन उत्खनन थांबविण्यास म्हटले असता चालकाने जेसीबी वनपरिक्षेत्राधिकारी दिलीप कौशिक यांच्या अंगावर चालविण्याचा प्रयत्न करीत शासकीय कामात अडथळा निर्माण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तथापि वाहनचालक व अन्य एक व्यक्ती जेसीबी घेऊन पळून गेले. यावेळी कौशिक यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह १५ ते २० किम ीपर्यंत पाठलाग केला. जेसीबी व आरोपींना पकडण्यासाठी जीवाची पर्वा न करता रात्री ३ वाजतापासून त्यांचा पाठलाग केला.

दरम्यान, पहाटे ४.३० वाजता जेसीबी मशीन खातिया गावाजवळ पकडण्यात आली. यावेळी जेसीबीचालक व त्याचा सहकारी पळून जाण्यात यशस्वी झाले. जेसीबी ताब्यात घेण्यात आली आहे. चालक दिनेश महारवाडे व मालक कृष्णा फुंडे यांच्यावर वन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही उपवनसंरक्षक पवन जोंग, सहायक वनसंरक्षक अविनाश मेश्राम यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी दिलीप कौशिक यांनी केली.

# आपल्या पूर्वजांनी लावलेली झाडे आपल्याला श्वास देत आहेत-जिल्हाधिकारी नायर



**गोंदिया :–** नाबार्ड आणि श्री गणेश ग्रामीण विकास शिक्षण संस्था व श्री महाकालेश्वर ट्रस्ट समिति (इरी) यांच्या संयुक्त वतीने वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी प्रजीत नायर यांनी केले. अध्यक्षस्थानी नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक अविनाश लाड होते. पाहुणे म्हणून श्री गणेश ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे संचालक विजय बहेकार, जिल्हा बँक व्यवस्थापक सुरेशचंद्र टेटे, माजी समाजकल्याण आयुक्त अनिल देशमुख, वनपरिक्षेत्र अधिकारी आनंद मेश्राम, लीड मॅनेजर नरेंद्र मडावी, सरपंच देवानंद गडपायले, जि.प.सदस्य लक्ष्मी तरोणे, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. सत्यप्रकाश मेहरा,उपसरपंच भाऊलाल तरोणे, माजी उपसरपंच रवी तरोणे उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी नायर यांनी आपल्या पूर्वजांनी लावलेली झाडे आज आपल्याला श्वास देत आहेत. एक झाड लावण्याचा संकल्प २० वर्षापूर्वी होता, आता त्यास पुढे नेत ऑक्सिजन टंचाई उपसरपंच भाऊलाल तरोणे, माजी उपसरपंच रवी तरोणे उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी नायर यांनी आपल्या पूर्वजांनी लावलेली झाडे आज आपल्याला श्वास देत आहेत. एक झाड लावण्याचा संकल्प २० वर्षापूर्वी होता, आता त्यास पुढे नेत ऑक्सिजन टंचाई टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे, असे सांगितले. डॉ. मेहरा यांनी, आपण पृथ्वीचा निसर्गसौंदर्याचा श्रृंगार हटवला आहे. तो पुन्हा बहाल करणे ही आपली जबाबदारी आहे, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास शेकडो विद्यार्थ्यांसह नागरिक, समाज–सेवक व शेतकरी उपस्थित होते. सूत्रसंचालन बहेकार यांनी केले. आभार ग्रामविकास अधिकारी आर.आर.जमईवार यांनी मानले.

# विदर्भ राज्य निर्माण संकल्प मेळाव्याचे गोंदियात आयोजन



**गोंदिया :–** स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माणचे संकल्प म्हणून जिल्हयात स्वतंत्र विदर्भ राज्याचा वणवा पेटवण्यासाठी गोंदियात विदर्भवाद्यांचा मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या जिल्हा कोअर कमेटी सदस्य, जिल्हा समन्वयक, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, वेगवेगळ्या पातळीवरील पदाधिकारी व नेते यांची १८ जुलैला स्थानिक शासकीय विश्रामगृह, रेलटोली गोंदिया येथे सभा पार पडली. यावेळी हा निर्णय घेण्यात आला.

आयोजित सबेत ९ ऑगस्ट क्रांतीदिनी नागपूर येथे आयोजित आंदोलनात उपस्थिति, ५ व ६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात मंडल यात्रेचे आगमन विषयी चर्चा, २८ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा जिल्ह्यात करावयाच्या ङ्गनागपूर करार होळीफयांआदोलनाचे स्वरूप व पूर्व तयारी बाबत चर्चा, महाराष्ट्र विधी मंडळाच्या कालावधित नागपुरला घ्यावयाच्या ङ्गलॉग मार्चफ व मेळावा बाबत चर्चा करण्यात आली. व विदर्भातील समस्यासह जनसुरक्षा कायदा, शिक्षण बचाव मोहीम, शेतकरी समस्या व स्थानिक मागण्या या विषयी पुढील आंदोलनाची दिशा ठरविणे या विषयांवर चर्चा करण्यातआली आणि आम संमतीने निर्णय घेण्यात आले.

सभेला जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, जिल्हाध्यक्ष वसंत गवळी, कोर कमेटी सदस्य छैलबिहारी अग्रवाल, यशवंत रामटेके, वजीर बिसेन, सुंदरलाल लिल्हारे, रमेश बिसेन, जिल्हा उपाध्यक्ष भोजराजठाकरे, जिल्हा महासचिव सी. पी. बिसेन, जिल्हा सचिव भूपेंद्र पटले, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष पंचशीला पानतावणे अरुण बन्नाटे, कार्यकर्ते मनोहर भावे, हिमांशू भाजीपाले, सुरेंद्र नागभीरे, यशवंत वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते.

# सैन्य भरती प्रशिक्षणाकरिता तालुक्यातील युवक रवाना



**तिरोडा :–** अदानी फाउंडेशन तिरोडाद्वारा जिल्ह्यातील युवक–युवतींकरिता मागील सहा वर्षांपासून सैन्य, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जात आहे. यातून आतापर्यंत ८० पेक्षा जास्त युवक सैन्य, पोलिस व इतर सेवांमध्ये रुजू झाले आहेत. याच प्रशिक्षणाचा पुढचा टप्पा म्हणून अदानी फाउंडेशनद्वारा राष्ट्रीय रक्षा युनिव्हर्सिटी गांधीनगर येथे तालुक्यातील १६ युवकांना ७५ दिवसांच्या निवासी सैन्य भरती प्रशिक्षणाकरिता अद–ानी पावर प्रमुख मयंक दोशी यांच्या मार्गदर्शनात पाठविण्यात आले आहे.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अदानी पॉवरचे एचआर हेड गणेश तरवडे या युवकांना प्रामुख्याने उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान सैन्यभरतीकरिता शारीरिक व बौद्धिक दृष्टीने परिपक्व करून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रशिक्षण तज्ज्ञ मार्गदर्शकाद्वारे देण्यात येणार आहे आणि त्याचा निश्चितच युवकांना फायदा होईल, असे मत अदानी फाउंडेशन प्रमुख बीमुल पटेल यांनी व्यक्त केले. तर पुढील बॅचच्या प्रशिक्षणासाठी इच्छुक युवकांनी अदानी फाउंडेशनचे प्रकल्प अधिकारी राहुल शेजव यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

# ४ ऑगस्ट रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**गोंदिया:** जिल्ह्यामध्ये सर्व सामान्य जनतेसाठी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. दिनांक ०४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे कार्यक्रम जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली,जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचे कडून जलतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागांचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देतील. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्त या कार्यक्रमात ज्या नागरिकांनी १५ दिवसापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित राहून आपल्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी सादर करावीत. याबाबत सर्व जनतेनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# ओटीपी विचारून भामट्यांनी घातला ४ कोटींचा गंडा

**गोंदिया:–** सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. जिल्ह्यात गत अडीच वर्षांत ५४ जणांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. यात नागरिकांना ४ कोटी २२ लाखांचा गंडा घालण्यात आला. त्यातील १७ प्रकरणांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून ६१.३४ लाख रुपये परत मिळवून दिले.

सायबर गुन्हे हा संगणक किंवा संगणक नेटवर्कशी संबंधित गुन्हा आहे. अशा प्रकरणांमध्ये, गुन्हे करण्यासाठी संगणकांचा वापर केला जातो. संशयास्पद संदेश पाठवून खात्यातून पैसे काढले जाते. अलीकडे इंटरनेटचा वापर वाढला आहे. त्यातच ओटीपी, लिंक आणि विविध माध्यमांतून फ सवणूक करण्याचा गोरखधंदा काही समाजकंटकांनी सुरू केला आहे.




ऑनलाइन फसवणूक करणाऱ्यांनी जिल्ह्यातील अनेक लोकांना आपले बळी बनविले. २०२३ मध्ये जिल्ह्यात सायबर गुन्ह्यांचे २६ गुन्हे दाखल झाले होते. त्यांपैकी पोलिसांनी १ गुन्हा उघड केला आणि ४ आरोपींना अटक केली. ३ आरोपींचा शोध अजूनही सुरू आहे. ऑनलाइन फ सवणूक करणाऱ्यांनी तक्रारदारांची ९५ लाख ८७ हजार ३४२ रुपयांची फसवणूक केली होती. त्यापैकी सायबर पोलिसांनी फक्त ५३ हजार रुपये गोठविले. त्याचप्रमाणे २०२४ मध्ये ऑनलाइन फसवणुकीचे २२ गुन्हे दाखल झाले. त्यांपैकी ६ गुन्हे उघड झाले आणि ४ आर–ोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले. फसवणूक करणाऱ्यांनी ऑनलाइन ४ कोटी २२ लाख २३ हजार ९७७ रुपये उकळले. त्यापैकी पोलिसांनी ६० लाख ८१ हजार ६१९ रुपये वसूल केले.

**ऑनलाइन फसवणूक टाळता यावी, यासाठी शाळा, महाविद्यालयांत जनजागृती केली जाते. त्याचबरोबर विशेष पथकाचीही स्थापना करण्यात आली. सायबर सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगून आपली फसवणूक होण्यापासून बचाव करावा.**
**– पुरुषोत्तम अहेरकर, पोलिस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा**

२०२५ मध्ये आतापर्यंत ६ गुन्हे दाखल झाले आहेत आणि ३ प्रकरणे उघडकीस आली. यात सायबर गुंडांनी तक्रारदारांची २३ लाख २० हजार ९५२ रुपयांनी फ सवणूक केली. परंतु यापैकी एकही प्रकरण अद्याप उघड झाले नाही. फसवणुकीचा भस्मासूर दिवसेंदिवस विक्राळ रूप धारण करीत आहे. त्यापासून नागरिकांनी स्वतः सुजाण होऊन कोणत्याही आमिषाला बळी पडू नये तसेच वैयक्तिक माहिती कुणाशीही शेअर करू नये, असे आवाहन पोलिस विभागातर्फे करण्यात आले. गत २ वर्षांपूर्वी मध्य प्रदेशात ४० दिवसांत पैसे दुप्पट करून देणारी टोळी सक्रिय झाली होती. त्याच्याकडे जिल्ह्यातील शेकडो जणांनी गुंतवणूक केली. मात्र एकाही व्यक्तीला परतावा मिळाला नाही. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी छापामार कारवाई करीत लांजी येथील ३ जणांना कोट्यवधी रुपयांसह अटक केली.

# शासन १५० दिवस ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाचा आढावा

**गोंदिया :–** सद्यःस्थितीत राज्य शासनाच्या ‘गतिमान महाराष्ट्र’ अंतर्गत शासनाच्या १५० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत ई–गव्हर्नन्स सुधारणा सुरू असून, शासकीय कार्यालयांमध्ये ई–प्रशासन सुधारणाबाबत अंमलबजावणी सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कामकाजाचा आढावा घेतला.



बैठकीत आरोग्य विभागाचे सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद वाघमारे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे, सहायक प्रशासन अधिकारी प्रमोद काळे, कनिष्ठ सहायक प्रशासन अधिकारी श्याम लिचडे, जिल्हा आयईसी अधिकारी प्रशांत खरात, राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे, जिल्हा लेखा व्यवस्थापक संकेत मोरघरे विभागांचे कार्यक्रम समन्वयक व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोल्हार यांनी, सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालयाने आगामी १५० दिवसांमध्ये त्यांचे कार्यालय प्रशासनाच्या दृष्टीने सर्वकष सुधारणा करून नागरिकांना सोयीचे कसे होईल, यासाठी विशेष सुविधा पुरवणे अपेक्षित असल्याचे सांगितले. सर्व कर्मचाऱ्यांनी कुठलेही प्रस्ताव प्रलंबित न ठेवता आवश्यक कार्यवाही करून वरिष्ठ आपल्याकडे येणाऱ्या सर्व फाइल्सचा निपटारा करणे आवश्यक आहे. तसेच कार्यालयात ई–ऑफिसने पाठविणे आवश्यक असल्याचे सांगितले. शासनाच्या १५० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत ई–गव्हर्नन्स सु–धारणामुळे शासन ते नागरिक याम धील संवाद, शासनामध्ये अंतर्गत सुसंवाद, शासन संकेतस्थळ, आपले सरकार, ई–ऑफिस व डॅशबोर्ड वेब ॲप्लिकेशन अद्ययावत राहण्यास मदत मिळणार आहे.